पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २८७ ■ रविवार, दि. २६ एप्रिल २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

## सिलिंडर बुकिंगच्या नियमात पुन्हा बदल होणार?

**मुंबई:** नवा नियम लागू झाल्यास महिन्याला मिळणारा गॅस सिलिंडर डिलिव्हरी करण्याच्या पद्धतीवर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सर्वांना सिलिंडरच्या नियमाबाबत अलर्ट राहावे लागणार आहे. मे महिन्यात गॅसच्या किंमती आणि धोरणात बदल होऊ शकतो. महिन्याच्या पहिल्या तारखेपासून गॅसच्या दरात बदल होऊ शकतो. मे महिन्यापासून सिलिंडर बुकिंगचा अवधी वाढवण्याची शक्यता व्यक्ती केली आहे. नव्या नियमानुसार, १ मे पासून एक सिलिंडरनंतरचा बुकिंगचा कालावधी बदलण्याची शक्यता आहे. ओटीपी आधारित डिलिव्हरी सिस्टम देखील कायमस्वरुपी केली जाऊ शकते. नव्या महिन्यापासून सिलिंडर डिलिव्हरीसाठी नोंदणीकृत मोबाइल नंबरवर ओटीपी मिळेल.



# 45 अंश तापमानात टीन शेड मध्ये चिमुकल्यांनी दिली स्कॉलरशिप परीक्षा

## शहरातील मिलिंद विद्यालयातील प्रकार.... पालकांमध्ये तीव्र नाराजी

प्रतिनिधी २६ एप्रिल

**अकोला:** राज्यात सध्या उष्णतेची तीव्र लाट निर्माण झाली आहे. संपूर्ण राज्यात अकोला शहर तापमानाच्या बाबतीत एक नंबर वर पोहोचले आहे. अकोला जिल्ह्यात तापमान ४५ अंश सेल्सिअसच्या वर पोहोचले आहे. एक प्रकारे जिल्ह्यात सूर्य आग ओकत आहे. एकीकडे या उन्हामुळे घरातील मोठ्या व्यक्ती बाहेर निघण्यास धजावत नसताना दुसरीकडे अकोला शहरातील वाशिम बायपास परिसरातील मिलिंद विद्यालयात स्कॉलरशिप ची परीक्षा देण्यासाठी आलेल्या विद्यार्थ्यांना एका टीन शेडमध्ये परीक्षा देण्यास बाध्य करण्यात आले. भर उन्हात सर्वसामान्य नागरिकांनाही घराबाहेर पडणे कठीण झाले असताना या लहान चिमुकल्यांना परीक्षा केंद्रांवर जाऊन तीन शेडमध्ये पेपर द्यावा लागला. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार पेपर देताना हे सर्वच विद्यार्थी घामाघुन झाल्याचे पहावयास मिळाले. केव्हा एकदा परीक्षा संपते व केव्हा घरी जातो अशी परिस्थिती या विद्यार्थ्यांची झाली होती. विदर्भातील वाढत्या तापमानाचा विचार न करता परीक्षा घेण्यात आल्याचा आरोप पालकांकडून केला जात आहे. या परीक्षेचे वेळापत्रकही दुपारच्या वेळेत असल्याने विद्यार्थ्यांना अधिक त्रास सहन करावा लागला. सकाळी ११ ते १२.३० आणि दुपारी २ ते ३.३० या वेळेत दोन पेपर घेतले जात आहेत त्यामुळे विद्यार्थ्यांना कड़क उन्हात परीक्षा केंद्रावर



उपस्थित राहावे लागत आहे. एक तर मिलिंद विद्यालयात टीन शेडच्या एका क्लास रूम मध्ये चिमुकल्या विद्यार्थ्यांना परीक्षा देण्यास बाद्य करण्यात आले. या परीक्षा केंद्रावर पंखे, पिण्याचे पाणी, व इतर मूलभूत सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांचा जीव कासावीस झाला होता. विद्यार्थ्यांसोबत आलेल्या पालकांनाही भर उन्हात बाहेर थांबावे लागले त्यांचीही मोठी गैरसोय झाल्याचे पहावयास मिळाले दरवर्षी साधारणतः दहा ते पंधरा एप्रिल दरम्यान परीक्षा संपवण्याची पद्धत असताना यंदा उशिरा परीक्षा घेण्यात आल्याने परिस्थिती अधिकच गंभीर झाली आहे. हा प्रकार विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी खेळणारा असून त्याची उच्चस्तरीय चौकशी व्हावी तसेच ४५ अंश से. तापमानामध्ये परिक्षा घेणे कितपत योग्य आहे असा सवाल काही पालकांनी नाव न सांगण्याच्या अटीवर केला आहे. याप्रकारामुळे अकोला शहरात बरीच उलट सुलट चर्चा देखील झाली असल्याचे समजते.

### दोन दिवस उष्णतेच्या लाटेची शक्यता
### जिल्हा प्रशासनाच्या सूचनांची अवहेलना

जिल्ह्यात २५ ते २७ एप्रिल दरम्यान उष्णतेची लाट राहण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान केंद्राने वर्तवली आहे. त्यानुसार नागरिकांसाठी जिल्हा प्रशासनातर्फे मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या आहेत. असे असताना सुद्धा एखाद्या गरम भट्टीसारख्या वातावरणात टीन शेड खाली विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. या उन्हाचा फटका जर एखाद्या विद्यार्थ्याला बसला तर त्याला जबाबदार ? हा मोठा प्रश्न निर्माण होत आहे त्यामुळे मिलिंद विद्यालयाचा हा बेजबाबदारपणा पाहता जिल्हाधिकाऱ्यांनी योग्य ती कारवाई करावी अशी मागणी पालक वर्गातर्फे होत आहे...

# अकोला वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची 117 वर्षापासून विश्वास आणि आपुलकीची परंपरा

## बँकेचे अध्यक्ष डॉ. जयराज संतोषराव कोरपे यांचे प्रतिपादन....





प्रतिनिधी २६ एप्रिल

**अकोला:** अकोला वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा पारदर्शी व्यवहार, लोकांचा विश्वास, आपुलकी मुळे संस्था निरंतर प्रगती करत आहे. बँकेच्या निवडणुकीत सहकार पॅनल निर्विरोध निवडून आले आहे. याचे श्रेय सर्व जनतेला तसेच ग्राहक व शेतकरी बांधवांना आहे. अजून बरेच काही करायचे आहे त्यात सगळ्यांचे मला सहकार्य मिळेल अशी अपेक्षा बँकेचे अध्यक्ष डॉ. जयराज संतोषराव कोरपे यांनी व्यक्त केले. बँकेच्या मार्केट यार्ड शाखेचे उदघाटक म्हणून ते बोलत होते.

रविवारी सकाळी अकोला मार्केट यार्ड शाखेचे मान्यवरांच्या उपस्थिती मध्ये स्थलांतर झाले. अकोला कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिरीष धोत्रे म्हणाले, संस्थेची इमारत जुनी झाली होती त्यामुळे नवीन तयार करण्यात आली संस्था निरंतर अशीच प्रगती करत राहो, नवीन इमारत हे संपूर्ण सुसज्जित आहे सोबतच शेतकऱ्यांसाठी राहण्याची व्यवस्था सुद्धा त्यामध्ये करण्यात आलेली आहे. बँकेच्या संचालिका अपर्णाताई धोत्रे म्हणाल्या, आजचा आनंदाचा क्षण आहे. आणि लोकांचा विश्वास असाच राहील, नवीन वास्तूचा आनंद व्यक्त करताना नवीन इमारतीबद्दल सगळ्यांना शुभेच्छा दिल्या

माजी संचालक डॉ. सुभाष धोत्रे म्हणाले, संस्थेने नेहमी ग्राहकांच्या फायद्याचाच विचार केलेला आहे. वेगवेगळे चार्जेस लागायचे ते आता त्यांनी बंद केलेले आहेत. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनंत वैद्य यांनी विविध योजनांची माहिति दिली. कार्यक्रमाला बँकेचे संचालक रामेश्वर वाघ, अनिल जाधव, डॉ. अभिषेक तिडके, सौ. कल्पनाताई पाचपोर, गोपाल भाऊ काकड, बाजार समिती उपसभापती ज्ञानेश्वर महल्ले यांच्यासह बँकेचे अधिकारी, भागधारक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 35 लाख शेतकऱ्यांना कर्जमाफी?

प्रतिनिधी २६ एप्रिल

**मुंबई :** राज्यातील कर्जबाजारी शेतकऱ्यांना पुन्हा महात्मा फुले कर्जमाफी योजनेच्या निकषानुसारच मदत दिली जाणार असून, यापोटी सरकारवर २२ ते २७ हजार कोटींचा आर्थिक भार पडणार आहे. निकषानुसार सुमारे ३५-४० लाख शेतकरी या योजनेत पात्र ठरतील. दोन लाखांपर्यंतचे थकीत कर्ज असलेल्या शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज सरकार भरणार आहे, अशी माहिती मंत्रालयातील सूत्रांनी दिली. महायुती सरकारने २०२४च्या विधानसभा निवडणुकीदरम्यान कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. त्यानुसार ३० ऑक्टोबर २०२५ मध्ये मित्रा संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली वित्त, कृषी, सहकार विभागाचे सचिव तसेच राज्य बँकेचे प्रशासक यांचा समावेश असलेली समिती स्थापन करण्यात आली होती.

# शहरातील राशन कार्ड धारकांची फसवणूक !



## काही राशन दुकानांवर तीन ऐवजी दोनच महिन्याच्या धान्याचे वितरण

प्रतिनिधी २६ एप्रिल

**अकोला:** सध्या राज्यात उष्णतेची लाट निर्माण झाली आहे. मान्सून पूर्व तयारीच्या पार्श्वभूमीवर तसेच कडक उन्हापासून नागरिकांचा बचाव व्हावा यासाठी शासनाच्या निर्देशानुसार एप्रिल मे व जून या तीन महिन्यातील मोफत धान्याची वितरण एप्रिल या एकाच महिन्यात करण्यात येत आहे.

त्यासाठी शासनाने जिल्ह्यातील पात्र राशन कार्ड धारक कुटुंबांना बाकी असलेला तीस हजार क्विंटल तांदूळ आणि वीस हजार क्विंटल गहू असा ५० हजार क्विंटल धान्याचा साठा २२ एप्रिल पर्यंत उपलब्ध करून दिला आहे. राशन दुकानांमध्ये अंत्योदय अन्न योजना आणि प्राधान्य गटातील लाभार्थी शिधापत्रिकांना या तीन महिन्याच्या धान्याचे मोफत वितरण करणे सुरू आहे.

सर्वच पात्र राशन कार्ड धारकांना तीन महिन्याचे धान्य एकाच महिन्यात करण्याचे आदेश शासनाने दिले आहेत. परंतु या उपरही शहरातील अनेक राशन दुकानदारांनी राशन कार्ड धारकांच्या मापात पाप करण्याचे काम सुरू केले आहे. अनेक राशन कार्ड धारकांना केवळ दोनच महिन्याचे धान्य दिले जात असून एक महिन्याचे धान्य नंतर मिळेल असे लॉलीपॉप दिले जात आहे. अशी तक्रार अनेक राशन कार्ड धारक करीत आहेत.काही राशन दुकानांवर ग्राहक आणि दुकानदार यामध्ये वाद होत आहेत, त्यावर बिनधास्तपणे राशन दुकानदार तुम्हाला कुठे तक्रार करायची असेल तर करा असे उद्धट उत्तर देत आहेत. बिचारे राशन कार्ड धारक धान्य मोफत मिळत आहे म्हणून मुकाटपणे तीन ऐवजी दोनच महिन्याचे धान्य घेत आहेत. हे पाहता मनमानी करून आपले उखळ पांढरे करून घेणाऱ्या या राशन दुकानदारांवर जिल्हाधिकाऱ्यांनी तसेच जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी कारवाई करावी अशी मागणी होत आहे

# अकोल्यात सूर्याचा प्रकोप !

## एप्रिलमध्येच अनुभवायला मिळते मे हिट

### 45.6 अंश तापमानासह अकोला देशात अव्वल



प्रतिनिधी २६ एप्रिल

**अकोला:** यंदा अकोलेकरांना उन्हाळ्याचे चटके केवळ जाणवत नसून ते होरपळून काढत आहेत. एप्रिल महिन्याच्या अखेरीस अकोल्यात तापमानाचा पारा प्रचंड वाढला असून आज अकोल्यात ४५.६ अंश सेल्सिअस जवळपास ४६ अंश सेल्सिअस इतक्या उच्चांकी तापमानाची नोंद झाली आहे. विशेष म्हणजे, आजच्या नोंदीनुसार अकोला हे देशातील सर्वाधिक उष्ण शहर ठरले आहे.

साधारणपणे मे महिन्याच्या शेवटी शेवटी अकोल्यात अशा प्रकारच्या उच्चांकी तापमानाची नोंद होत असते. मात्र, यंदा एप्रिल महिन्याच्या शेवटच्या आठवड्यातच पारा ४६ अंशांच्या जवळ पोहोचल्याने हवामान तज्ज्ञांनीही चिंता व्यक्त केली आहे. मे महिन्यापूर्वीच अकोल्याने तापमानाचे सर्व जुने रेकॉर्ड मोडीत काढले असून नागरिकांना भीषण उन्हाचा सामना करावा लागत आहे. हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, अकोल्यात पुढील दोन दिवस उष्णतेची लाट कायम राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे अकोलेकरांनी दुपारी १२ ते सायंकाळी ४ या वेळेत अत्यंत आवश्यक काम असल्याशिवाय घराबाहेर पडू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. वाढत्या उष्णतेमुळे उष्माघाताचा धोका निर्माण झाला असून नागरिकांनी स्वतःचा बचाव करणे गरजेचे आहे. शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होऊ देऊ नका, लिंबू सरबत किंवा ताकाचा वापर करा. घराबाहेर पडताना डोक्याला रुमाल, टोपी किंवा छत्रीचा वापर करा आणि सुती कपडे परिधान करा. कडक उन्हात शारीरिक कष्टाची कामे करणे टाळा.अकोल्यातील या 'सूर्याग्नी'मुळे रस्ते दुपारच्या वेळी निर्मनुष्य होत असून, वाढत्या तापमानाचा परिणाम जनजीवनावर स्पष्टपणे दिसून येत आहे. सोमवारपर्यंत अकोलेकरांना या प्रखर उन्हापासून स्वतःचे संरक्षण करावे लागणार आहे.




CMYK CMYK

सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा
रविवार, दि. २६ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# आमची जनगणना, आमचा विकास पहिल्या टप्प्यात स्वगणनेला १ मेपासून प्रारंभ

**अकोला:** देशभरात राष्ट्रीय जनगणना कार्यक्रमाची सुरूवात होत असून, पहिला टप्प्यात स्वगणना १ मे ते १५ मे दरम्यान होणार आहे. स्वगणनेद्वारे नागरिक आपल्या कुटुंबाची माहिती स्वतः ऑनलाईन भरू शकतात. अधिकाधिक नागरिकांनी आपली नोंदणी करावी, असे आवाहन प्रधान जनगणना अधिकारी तथा जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी केले आहे. स्वगणनेची सुविधेमुळे नागरिकांना स्वत: माहिती भरता येणे शक्य आहे. प्रत्यक्ष घर गणना प्रगणकाद्वारे १६ मे ते १४ जून दरम्यान होणार आहे. स्व-गणना प्रक्रियाष्ऑनलाईन नोंदणीचे टप्पे: https://es.census.gov.in या अधिकृत पोर्टलवर जा. कुटुंब प्रमुखाचे नाव आणि १० अंकी मोबाईल क्रमांक नोंदवून ओटीपीद्वारे लॉग-इन करा. आपला जिल्हा, पिन कोड आणि गावाचे नाव निवडा. गुगल मॅपवर आपल्या राहण्याचे ठिकाण निश्चित करा. विचारलेल्या ३३ प्रश्नांची उत्तरे पर्यायांमधून निवडा. माहितीची खात्री करून 'फायनल सबमिशन' करा.

# तळागाळातील विद्यार्थ्यांची जडणघडण हेच ध्येय

## आज पर्यंत १५ पुस्तके प्रकाशित; गरजू विद्यार्थ्यांना मोफत मार्गदर्शन

### शहरा ऐवजी गावात राहून घडवले हजारो विद्यार्थी

वाशीम जिल्ह्यातील मंगरूळपीर शहरात अनेक शाळा, महाविद्यालये, इंग्लिश स्कूल व कॉन्व्हेंट असून ही विद्यार्थ्यां मध्ये इंग्रजी भाषेचा अभाव प्रकर्षाने जाणवत होता. इंग्रजी ही आंतरराष्ट्रीय भाषा असल्याने प्रत्येक विद्यार्थ्याला तिचे ज्ञान असणे अत्यावश्यक आहे. मात्र, ही भाषा प्रभावीपणे कशी शिकावी याचे सखोल मार्गदर्शन स्थानिक पातळीवर उपलब्ध नसल्याने अनेक विद्यार्थ्यांना अडचणींचा सामना करावा लागत होता. अशा परिस्थितीत एस. एस. मनवर सरांनी मंगरूळपीर मध्ये इंग्रजी शिक्षणाचा ज्ञानदीप प्रज्वलित केला.

नागपूरमध्ये तब्बल दहा वर्षे अध्यापनाचा अनुभव घेतल्या नंतर त्यांनी सन २००० पासून मंगरूळपीर मध्ये इंग्रजी शिकवण्यास सुरुवात केली. त्याआधी त्यांनी भंडारा, गडचिरोली, काटोल त्याचप्रमाणे विविध भागात जाऊन विद्यार्थ्यांच्या अडचणींचा अभ्यास केला. विद्यार्थ्यांना नेमक्या कोणत्या प्रकारच्या अडचणी येतात आणि शालेय शिक्षणात काय कमी पडते, याचा सखोल अभ्यास करून त्यांनी आपली अध्यापन पद्धती विकसित केली.

मंगरूळपीर मध्ये स्थायिक झाल्या नंतर त्यांनी गोरेगाव, औरंगाबाद, बार्शीटाकळी, अकोला, पिंजर, मालेगाव, मानोरा, रिसोड, वाशीम, कारंजा अशा विविध ठिकाणी इंग्रजीचे वर्ग घेतले. कॉन्व्हेंटच्या संपूर्ण स्टाफला त्यांनी इंग्रजी शिकवले. विविध महाविद्यालयामध्ये त्यांचे सेमिनार घेण्यात आले. विद्यार्थ्यांच्या गरजा लक्षात घेऊन त्यांनी स्वतःची अभ्यासपुर्ण पुस्तके तयार केली आणि दरवर्षी त्यामध्ये आवश्यक ते बदल केले.

शिकवण्याची खासियत म्हणजे अवघड इंग्रजी विषय अत्यंत सोप्या व समजण्या सारख्या भाषेत विद्यार्थ्यां पर्यंत पोहोचवणे.

एस. एस. मनवर सरांनी इंग्लंड मधील विविध पुस्तकांचा तसेच शालेय अभ्यासक्रमाचा सखोल अभ्यास करून विद्यार्थ्यां साठी प्रभावी अभ्यास पद्धती विकसित केली. त्यामुळे त्यांच्या मार्गदर्शना खाली शिकलेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा-पुन्हा ट्युशन लावण्याची गरज भासत नाही. २००० ते २०२६ या कालावधीत त्यांनी अविरतपणे हजारो विद्यार्थ्यांना इंग्रजीचे शिक्षण दिले असून आजही ते ऑनलाईन आणि ऑफलाईन दोन्ही माध्यमातून अध्यापन करत आहेत.

विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांना इंग्रजीचे अगदी प्राथमिक ज्ञान ही नाही, अशांना सक्षम बनवण्यावर त्यांचा विशेष भर असतो. आर्थिक परिस्थिती कमकुवत असलेल्या विद्यार्थ्यांना ते मोफत शिक्षण देतात. फी न भरल्यामुळे विद्यार्थ्यांना कधीही वर्गातून बाहेर काढले जात नाही, ही त्यांची मोठी सामाजिक बांधीलकी आहे. अनेकांनी त्यांना मोठ्या शहरांमध्ये जाऊन अधिक उत्पन्न मिळवण्याचा सल्ला दिला.

मात्र, 'मला पैशांपेक्षा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना इंग्रजी शिकवणे अधिक महत्त्वाचे वाटते,' असे सांगत त्यांनी गावातच राहून ज्ञानदानाचा यज्ञ अविरतपणे सुरु ठेवण्याचा संकल्प केला आहे.

शैक्षणिक क्षेत्रा सोबतच सामाजिक कार्यातही मनवर सर नेहमी अग्रस्थानी असतात. विविध समाजघटकांमध्ये त्यांची स्वतंत्र ओळख निर्माण झाली असून ते निःस्वार्थ भावनेने लोकांना योग्य मार्गदर्शन करतात. 'लोकांचे भले झाले तर आपले भले होईल,' हे त्यांचे ब्रिदवाक्य आजही त्यांच्या कार्यातून प्रकर्षाने दिसून येते.

मंगरूळपीर आणि परिसरातील विद्यार्थ्यां साठी एस. एस. मनवर सर हे केवळ शिक्षक नसून एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व ठरले आहेत. त्यांची ओळख इंग्लिश गुरु म्हणून आहे. त्यांनी आज पर्यंत इंग्रजी मध्ये १५ पुस्तके लिहून प्रकाशित केली, ही त्यांची मोठी देणगी आहे. त्यांच्या पाठीशी नेहमी आई-वडिलांचा आशीर्वाद राहिला असून वडील व मोठे बंधू किरण मनवर नसताना ही आपल्या परिवारावर पूर्णपणे लक्ष देत आहेत. त्यांनी गोरगरीबांच्या मुलांना शिकवताना ज्याप्रमाणे आपल्या मुलावर त्यांचं लक्ष असते तसेच ते मुलं सुद्धा आपलेच आहेत असे ते नेहमी सांगत असतात. त्यांची प्रगती म्हणजे आपली प्रगती हेच माझे शेवटपर्यंत प्रयत्न असतील असे ही त्यांच्या बोलण्यातून उच्चारल्या जाते.



एस. एस. मनवर
मंगरुळपीर

# ज्ञानभारतम् प्रकल्पांतर्गत राष्ट्रीय हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेला प्रारंभ

भारताला हस्तलिखितांचा फार मोठा वारसा लाभलेला आहे. पारंपारिक ज्ञान हे पिढीदर पिढी या हस्तलिखितांद्वारे प्रसारीत होत आलेले आहे. परंतु हे सर्व हस्तलिखिते जागोजागी विखुरलेल्या स्वरुपात आहेत. सदरील हस्तलिखितांचे ज्ञानभांडार एकत्र करुन एकाच ठिकाणी उपलब्ध करुन देता यावे या दृष्टीने भारत सरकारने ज्ञानभारतम् या प्रकल्पाची आखणी केली आहे. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश भारतातील मौल्यवान हस्तलिखित वारशाचे सर्वेक्षण, दस्तऐवजीकरण, संवर्धन, डिजिटायझेशन व प्रसार करणे हा आहे.




भारताला हस्तलिखितांचा फार मोठा वारसा लाभलेला आहे. पारंपारिक ज्ञान हे पिढीदर पिढी या हस्तलिखितांद्वारे प्रसारीत होत आलेले आहे. परंतु हे सर्व हस्तलिखिते जागोजागी विखुरलेल्या स्वरुपात आहेत. सदरील हस्तलिखितांचे ज्ञानभांडार एकत्र करुन एकाच ठिकाणी उपलब्ध करुन देता यावे या दृष्टीने भारत सरकारने ज्ञानभारतम् या प्रकल्पाची आखणी केली आहे. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश भारतातील मौल्यवान हस्तलिखित वारशाचे सर्वेक्षण, दस्तऐवजीकरण, संवर्धन, डिजिटायझेशन व प्रसार करणे हा आहे.

भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या ज्ञानभारतम् (Gyan Bharatam) या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत देशव्यापी हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेला दिनांक १६ मार्च २०२६ पासून प्रारंभ करण्यात आला आहे.

केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या या योजनेअंतर्गत देशभरातील शैक्षणिक संस्था, संग्रहालये, ग्रंथालये, धार्मिक संस्था तसेच खाजगी संग्राहक यांच्या सहकार्याने एक कोटीहून अधिक हस्तलिखितांचा शोध व नोंदणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तसेच भारताच्या समृद्ध ज्ञानपरंपरेशी संबंधित हस्तलिखितांचा राष्ट्रीय डिजिटल संग्रह (National Digital Repository) निर्माण करून तो राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उपलब्ध करून देण्याचा केंद्र शासनाचा मानस आहे. यामध्ये हस्तलिखितांची मालकी ही संबंधीत संस्था, ग्रंथालय अथवा खाजगी संग्राहक यांचीच राहणार आहे. परंतू कोणाला स्वखुशीने सदरील हस्तलिखिते शासनाकडे सुपुर्द करावयाची झाल्यास शासन ती स्विकारेल.

या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य सरकारांची महत्त्वपूर्ण भूमिका असून राज्यातील विविध सांस्कृतिक संस्था, विद्यापीठे, संशोधन संस्था, हस्तलिखित संग्रहालये तसेच विद्वान यांच्या सहकार्याने ही मोहीम राबविण्यात येणार आहे.

महाराष्ट्र राज्यात या प्रकल्पासाठी खालील संस्था क्लस्टर केंद्र व स्वतंत्र केंद्र म्हणून कार्यरत राहणार आहेत. कवी कालिदास संस्कृत विद्यापीठ, नागपूर - क्लस्टर केंद्र, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था, पुणे - क्लस्टर केंद्र, आनंद आश्रम संस्थान, पुणे - स्वतंत्र केंद्र, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे - स्वतंत्र केंद्र.

महाराष्ट्र राज्यासाठी राज्य नोडल संस्था म्हणून पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची नियुक्ती करण्यात आली असून राज्य नोडल अधिकारी म्हणून सुजितकुमार उगले, संचालक, पुराभिलेख संचालनालय कार्य पाहणार आहेत. तर श्रीमती. अंजली ढमाळ, उपसंचालक, मराठी भाषा विकास संस्था, तथा अभिजात मराठी भाषा कक्ष, मराठी भाषा विभाग या सहनोडल अधिकारी म्हणून काम पाहणार आहेत.

सदर सर्वेक्षणासाठी ज्ञानभारतम् प्रकल्पांतर्गत Gyan Bharatam हे मोबाईल ॲप विकसित करण्यात आले असून त्याद्वारे हस्तलिखितांचे क्षेत्रीय मूल्यांकन, पडताळणी व दस्तऐवजीकरणाची प्रक्रिया पार पाडण्यात येणार आहे. या मोहिमेच्या अनुषंगाने सर्व जिल्हाधिकारी यांना त्यांच्या जिल्ह्यात ज्ञानभारतम् प्रकल्पासाठी जिल्हा नोडल अधिकारी नियुक्त करणे, जिल्हास्तरीय समिती स्थापन करणे, तसेच मंदिरे, मठ, धार्मिक संस्था, विद्यापीठे, ग्रंथालये, शैक्षणिक संस्था व खाजगी संग्राहक यांना सर्वेक्षणात सहभागी करून घेणे याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

या सर्वेक्षण मोहिमेत शैक्षणिक संस्था, ग्रंथालये, संग्रहालये, संस्कृत पाठशाळा, धार्मिक संस्था, संशोधक, पारंपरिक पंडित, तसेच ऽण्, ऽएए स्वयंसेवक, विद्यार्थी व वारसा संवर्धन संस्था यांचा सक्रिय सहभाग अपेक्षित आहे.

या निमित्ताने आवाहन करण्यात येते की, आपल्याकडे जर काही हस्तलिखिते उपलब्ध असतील तर त्याची माहिती ज्ञानभारतम् या मोबाईल ॲप वर अपलोड करावी व या राष्ट्र कार्यात सहभाग नोंदवावा.

# प्रोटीन – गैरसमज आणि सत्य

जिममध्ये किंवा फिटनेस बद्दल बोलताना प्रोटीन हा शब्द आपण नेहमी ऐकत असतो. काही लोक म्हणतात प्रोटीन घेणे शरीरासाठी खूप आवश्यक आहे, तर काही लोकांना वाटते की प्रोटीन घेतल्यामुळे किडनी ला त्रास होतो किंवा शरीरावर वाईट परिणाम होतात.

म्हणूनच अनेक लोकांच्या मनात एक प्रश्न असतो प्रोटीन घेणे योग्य आहे की अयोग्य?

या लेखामध्ये आपण प्रोटीन म्हणजे काय, शरीरासाठी ते का आवश्यक आहे आणि प्रोटीन घेण्याबाबत असलेले गैरसमज याबद्दल सोप्या भाषेत माहिती पाहणार आहोत.




जिममध्ये किंवा फिटनेस बद्दल बोलताना प्रोटीन हा शब्द आपण नेहमी ऐकत असतो. काही लोक म्हणतात प्रोटीन घेणे शरीरासाठी खूप आवश्यक आहे, तर काही लोकांना वाटते की प्रोटीन घेतल्यामुळे किडनी ला त्रास होतो किंवा शरीरावर वाईट परिणाम होतात.

म्हणूनच अनेक लोकांच्या मनात एक प्रश्न असतो प्रोटीन घेणे योग्य आहे की अयोग्य?

या लेखामध्ये आपण प्रोटीन म्हणजे काय, शरीरासाठी ते का आवश्यक आहे आणि प्रोटीन घेण्याबाबत असलेले गैरसमज याबद्दल सोप्या भाषेत माहिती पाहणार आहोत.

**प्रोटीन म्हणजे नेमके काय?**

प्रोटीन हे आपल्या शरीरासाठी आवश्यक असलेले एक महत्त्वाचे पोषकतत्व (न्युट्रिएंट) आहे.

आपल्या शरीरातील मसल्स, स्किन, हेअर, नेल्स आणि बॉडी टिश्यूज तयार करण्यासाठी आणि त्यांची दुरुस्ती (रिपेअर) करण्यासाठी प्रोटीनची गरज असते.

आपण रोज जे काम करतो, वर्कआउट करतो किंवा शरीरावर कोणत्याही प्रकारचा स्ट्रेस येतो, तेव्हा मसल्स मध्ये सूक्ष्म ताण (मायक्रो डॅमेज) तयार होतो. त्या मसल्स ला पुन्हा मजबूत करण्याचे काम प्रोटीन करते.

आपल्या शरीरासाठी प्रोटीन का आवश्यक आहे?

प्रोटीन हे फक्त मसल्स वाढवण्यासाठीच नाही तर शरीराच्या अनेक महत्त्वाच्या कामांसाठी आवश्यक असते.

- शरीरातील मसल्स तयार आणि मजबूत ठेवण्यासाठी
- वर्कआउट नंतर मसल रिकव्हरी जलद होण्यासाठी
- हेअर, स्किन आणि नेल्स निरोगी ठेवण्यासाठी
- शरीराची इम्युनिटी (रोगप्रतिकारशक्ती) मजबूत ठेवण्यासाठी
- शरीरातील हॉर्मोन्स आणि एन्झाइम्स तयार करण्यासाठी

म्हणजेच, प्रोटीन हे फक्त जिम करणाऱ्यांसाठी नाही तर प्रत्येक व्यक्तीसाठी आवश्यक असते.

प्रोटीन फक्त बॉडीबिल्डर लोकांसाठीच असते का?

हा एक खूप मोठा गैरसमज (मिथ) आहे.

अनेक लोकांना वाटते की प्रोटीन हे फक्त बॉडीबिल्डर किंवा हेवी वर्कआउट करणाऱ्या लोकांसाठीच असते. पण प्रत्यक्षात, सामान्य व्यक्तीलाही रोजच्या जीवनासाठी प्रोटीनची गरज असते.

आपण चालणे, काम करणे, जिने चढणे, घरातील कामे करणे — या सर्व गोष्टींमध्येही मसल्स काम करत असतात आणि त्यासाठी प्रोटीन आवश्यक असते.

सामान्य माणसाला दररोज किती प्रोटीन आवश्यक असते?

प्रोटीनची गरज प्रत्येक व्यक्तीच्या वजन, वय आणि फिजिकल ॲक्टिव्हिटी वर अवलंबून असते.

**साधारणपणे:** सामान्य व्यक्ती: प्रति किलो वजनाला ०.८ ते १ ग्रॅम प्रोटीन

वर्कआउट करणारी व्यक्ती: प्रति किलो वजनाला १.२ ते १.६ ग्रॅम प्रोटीन

हेवी ट्रेनिंग करणारे: प्रति किलो वजनाला १.६ ते २ ग्रॅम प्रोटीन

**उदाहरण:** जर एखाद्या व्यक्तीचे वजन ७० किलो असेल, तर त्याला साधारण ५६ ते ११२ ग्रॅम प्रोटीनची गरज लागू शकते.

प्रोटीन कमी घेतल्यास शरीरावर काय परिणाम होतात?

जर शरीराला आवश्यक तेवढे प्रोटीन मिळाले नाही, तर काही समस्या निर्माण होऊ शकतात.

- मसल्स कमकुवत होणे
- केस गळती वाढणे
- रोगप्रतिकारशक्ती कमी होणे
- रिकव्हरी मंद होणे
- पचन कमकुवत होणे

म्हणूनच, योग्य प्रमाणात प्रोटीन घेणे खूप महत्त्वाचे आहे.

**जास्त प्रोटीन घेतल्यास काही नुकसान होते का?**

योग्य प्रमाणात घेतलेले प्रोटीन शरीरासाठी सुरक्षित आणि फायदेशीर असते. पण अत्याधिक प्रमाणात (ओव्हरडोस) प्रोटीन घेणे टाळावे.

इथे एक महत्त्वाची गोष्ट समजून घेणे आवश्यक आहे की, आपल्या रोजच्या आहारातून बहुतेक लोकांना आवश्यक तेवढे प्रोटीन मिळतच नाही. त्यामुळे अनेक वेळा लोकांना वाटते की ते जास्त प्रोटीन घेत आहेत, पण प्रत्यक्षात ते त्यांच्या शरीराच्या गरजेपेक्षा कमीच प्रोटीन घेत असतात.

**'जास्त प्रोटीन' म्हणजे नेमके काय?**

जेव्हा आपल्या रोजच्या जेवणातून (फूड सोर्सेस मधून) आवश्यक तेवढे प्रोटीन पूर्ण झालेले असते आणि त्यानंतरही अतिरिक्त स्वरूपात सप्लिमेंट किंवा इतर सोर्सेस मधून प्रोटीन घेतले जाते, तेव्हा त्या परिस्थितीला जास्त प्रोटीन घेणे असे म्हणता येते.

**खूप जास्त प्रमाणात प्रोटीन घेतल्यास:**

- डायजेशन रिलेटेड त्रास होऊ शकतो
- किडनी वर अनावश्यक ताण येऊ शकतो (विशेषतः ज्यांना आधीच किडनी रिलेटेड समस्या आहेत)
- डिहायड्रेशन होऊ शकते

म्हणूनच, आपल्या शरीराच्या गरजेनुसार आणि डाएट पूर्ण झाल्यानंतरच सप्लिमेंट घेणे योग्य ठरते.

**प्रोटीन सप्लिमेंट (प्रोटीन पावडर) घेणे सुरक्षित आहे का?**

योग्य क्वालिटी चे आणि योग्य प्रमाणात घेतलेले प्रोटीन सप्लिमेंट साधारणपणे सुरक्षित असते.

**पण हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे की:**

- आधी नॅचरल फूड सोर्सेस मधून प्रोटीन घ्यावे
- सप्लिमेंट हे डाएट कम्प्लीट न झाल्यास वापरावे
- ट्रस्टेड ब्रँड आणि योग्य गाईडन्स मध्ये सप्लिमेंट घ्यावे

म्हणजेच, प्रोटीन पावडर हे जादूची गोळी नाही, तर फक्त एक सप्लिमेंट आहे.

**नैसर्गिक (नॅचरल) प्रोटीनचे चांगले स्त्रोत कोणते?**

आपल्या रोजच्या आहारातूनही चांगले प्रोटीन मिळू शकते.

दूध, दही, पनीर, अंडी, चिकन, मासे, मटण यांसारख्या पदार्थांमधून शरीराला उच्च दर्जाचे (हाय क्वालिटी) प्रोटीन मिळते.

या पदार्थांमध्ये शरीराला आवश्यक असलेले सर्व महत्त्वाचे घटक (एसेंशियल अमिनो ॲसिड्स) योग्य प्रमाणात उपलब्ध असतात, त्यामुळे हे पदार्थ कम्प्लीट प्रोटीन म्हणून ओळखले जातात.

तसेच डाळी, सोयाबीन, टोफू, चणा, राजमा इत्यादी पदार्थांमध्येही प्रोटीन असते.

परंतु या पदार्थांमधील प्रोटीनमध्ये काही आवश्यक घटक (अमिनो ॲसिड्स) कमी प्रमाणात असू शकतात, त्यामुळे यांना इनकम्प्लीट प्रोटीन असे म्हटले जाते.

प्रोटीन घेण्याबाबत असलेले गैरसमज (मिथ्स) आणि सत्य (फॅक्ट्स)

**मिथ:** प्रोटीन घेतल्यामुळे किडनी खराब होते

**फॅक्ट:** योग्य प्रमाणात घेतलेले प्रोटीन सामान्य व्यक्तीसाठी सुरक्षित असते.

**मिथ:** प्रोटीन घेतल्याने शरीर लगेच ल्त्व्ब् होते

**फॅक्ट:** bulkyहोण्यासाठी हेवी ट्रेनिंग आणि कॅलरी सरप्लस आवश्यक असतो.

मिथ: प्रोटीन पावडर म्हणजे स्टेरॉइड

फॅक्ट: प्रोटीन पावडर हे स्टेरॉइड नसून एक फूड सप्लिमेंट आहे.

**१) प्रोटीन सप्लिमेंट म्हणजे काय?**

व्हे कॉन्सन्ट्रेट, आयसोलेट, हायड्रोलायसेट हे प्रोटीन सप्लिमेंट्स नैसर्गिक दुधापासून तयार केलेले असतात.

**२) प्रोटीन सप्लिमेंट खरे आहे की नाही कसे ओळखावे?**

- बारकोड / क्यूआर कोड स्कॅन करा
- खूप स्वस्त दरातील प्रोडक्ट टाळा
- Ûeke (Taste) वेगळी वाटल्यास लक्ष द्या
- पॅकेजिंगची गुणवत्ता आणि सील तपासा
- नेहमी अधिकृत विक्रेत्याकडून खरेदी करा

**प्रोटीन दूधात की पाण्यात घ्यावे?**

प्रोटीन पाण्यात घेतल्यास ते लवकर पचते व शोषण जलद होते, त्यामुळे वर्कआउट नंतर ते अधिक उपयुक्त ठरते.

प्रोटीन दूधात घेतल्यास पचन थोडे हळू होते व अतिरिक्त कॅलरीज व प्रोटीन मिळतात, त्यामुळे वजन वाढवायचे असल्यास ते फायदेशीर ठरते.

**निष्कर्ष – प्रोटीन घेणे योग्य की अयोग्य?**

योग्य प्रमाणात आणि योग्य पद्धतीने घेतलेले प्रोटीन हे शरीरासाठी अत्यंत आवश्यक आणि फायदेशीर आहे.

प्रोटीन घेणे चुकीचे नाही, पण अज्ञानामुळे किंवा चुकीच्या प्रमाणात घेतल्यामुळे समस्या निर्माण होऊ शकतात.

म्हणूनच, आपल्या वजन, ॲक्टिव्हिटी लेव्हल आणि गोल्स नुसार योग्य प्रमाणात प्रोटीन घेणे हेच सर्वात योग्य आहे.



गणेश अंभोरे
फिटनेस प्रोफेशनल ॲंड न्युट्रीशनिस्ट अकोला

# विदर्भ क्रिकेट संघटनेद्वारा 'बॉलरचा शोध' करिता खुल्या निवड चाचणीची घोषणा

विदर्भ क्रिकेट संघटना विदर्भ अंतर्गत सर्व जिल्हे व शहरा मध्ये बोलर्स चा शोध (वेगवान व फिरकी) करिता सर्व जिल्ह्यामध्ये खुली निवड चाचणीचे आयोजन करित असून याचा उद्देश उभरत्या गोलंदाजाची निवड करून त्यांना पुढील व्यासपीठ उपलब्ध करून देणे आहे.

सदर कार्यक्रम विदर्भ प्रीमियर लीग सिझन २ अंतर्गत आयोजित करण्यात येत असून ज्यामुळे व्ही.सी.ए च्या क्रिकेटला मजबूत करणे व महत्वाकांक्षी गोलंदाजांना आपली प्रतिभा दाखवण्या करिता व्यासपीठ उपलब्ध करून देण्याची कटिबद्धता आहे.

निवड चाचणी प्रत्येक जिल्हा केंद्रावर आयोजित करण्यात येत असून जेणेकरून विविध स्तरावरून आलेले पुरुष व महिला दोन्ही इच्छुक गोलंदाजांना सहज भाग घेता येईल सदर निवड अनुभवी प्रशिक्षक तथा राष्ट्रीय क्रिकेट खेळाडू द्वारे केली जाईल ज्यामध्ये वेगवान तथा फिरकी गोलंदाजाच्या कौशल्यावर विशेष लक्ष देवून निवड चाचणी केली जाणार आहे.

निवड झालेल्या गोलंदाजांना नागपूर येथे वरिष्ठ प्रशिक्षका कडून विशेष प्रशिक्षण शिबिरातून प्रशिक्षण फिटनेस वर मार्गदर्शन करण्यात येईल व निवड झालेल्या गोलंदाजांना १ जून २०२६ ते १५ जून २०२६ होणार्या न्न्ञ्थ् सिझन २ स्पर्धेत सहभागी होण्याचा लाभ मिळेल.

सदर निवड चाचणी करिता वयोमर्यादा पुरुषांकरिता १६ ते २५ तथा महिला करिता १५ ते २३ असून इच्छुक गोलंदाजांना सूचित करण्या येते कि, त्यांनी क्रिकेटच्या पांढऱ्या पोशाखात येणे आवश्यक असून सोबत जन्म दाखला आणावा.

निवड चाचणी अकोला क्रिकेट क्लबवर होणार असून तारीख व वेळ लवकरच कळविण्यात येईल तत्पूर्वी सर्व इच्छुक गोलंदाज यांनी या सोबत दिलेल्या गुगल फॉर्म वर आपली माहिती भरून देणे आवश्यक असून माहिती भरून देण्यात आल्यावर आपल्यांर्ट्ूज् मोबाईल तथा इमेल वर आपल्याला तारीख, वेळ व स्थळ कळविण्यात येईल.

वरील संधीचा जिल्हयातील जास्तीत जास्त पुरुष व महिला गोलंदाजांनी फायदा घ्यावा असे आवाहन विदर्भ क्रिकेट संघटनेचे जिल्हा समिती चेयरमन नितेश उपाध्याय व जिल्हा संयोजक भरत डिक्कर यांनी केले आहे.

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर **८३९०६७०९९९** या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.

त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

३
सिटी न्यूज अकोला
रविवार, दि. २६ एप्रिल २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## मातंग समाजासाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन

**अकोला:** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.) यांच्या वतीने मातंग समाज व तत्सम बारा पोट जातीतील वंचित घटकांसाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा मंगळवार, दि. ५ मे २०२६ रोजी दुपारी १ वाजता सामाजिक न्याय भवन, निमवाडी, पोलीस वसाहत जवळ, अकोला येथे आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेचा मुख्य उद्देश म्हणजे मांग व मातंग समाजातील नागरिकांना विविध शासकीय योजनांची सविस्तर माहिती देणे तसेच त्यांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणणे हा आहे. कार्यशाळेत उपस्थितांना विविध योजना, लाभ घेण्याची प्रक्रिया आणि आवश्यक मार्गदर्शन दिले जाणार आहे. या कार्यशाळेला मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक एम. टी. खडसे यांनी केले आहे.

# मृद व जलसंधारण विभागाचा बांध ठरतोय आपत्ती

### ◆ बोर्डी येथील शेतकऱ्यांची फसवणूक केल्याचा आरोप

पवन बेलसरे २६ एप्रिल





**अकोट:** तालुक्यातील बोर्डी येथील मखरपुर रस्त्यावरील कासोद नदीवर कोल्हापुरी बंधारा शेतकऱ्यांच्या शेतातच बांधला. जलसंपदा अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांची फसवणूक केल्याचा आरोप होत आहे. बंधाऱ्यामधील मातीची ढिगारे उचलली नाहीत. नाल्याचे खोदकाम न करता शेतकऱ्यांच्या शेतात मातीचा ढिगारा पडलेला असून, बंधाऱ्याची सुरक्षा भिंत २०० फुटा ऐवजी फक्त ४० फुटात बांधून समस्या निर्माण झाल्या आहेत. काम व्यवस्थित झाले नाही तर आत्मदहन करू असा इशारा दिला आहे

बंधा-याचे काम ठेकेदार, मृद व जलसंधारण विभागाचे बेजबाबदार अधिकारी यांनी सुरूच ठेवले. शेतकऱ्यांनी पालकमंत्री, जिल्हाधिकारी, अकोटचे आमदार आणि मृद व जलसंधारणाच्या जबाबदार अधिकाऱ्यांना ९ फेब्रुवारी २०२६ रोजी वस्तुस्थिती सांगून अकोटला तक्रार सादर केली. परंतु कामावर येऊन शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन केले नाही. बांधकाम पूर्ण करून रातोरात बांधकामाचे साहित्य घेऊन पसार झाले. त्यामुळे अन्यायग्रस्त शेतकऱ्यांनी मुलाबाळांसह जिल्हाधिकारी यांच्याशी संवाद साधला तेव्हा तात्काळ कार्यवाहीचे आश्वासन दिले.

अकोला मृद जलसंधारण विभागाचे अधिकारी साइटवर आहे हे निमित्त पुढे करून ऑफिसमध्ये निवेदन घेण्याकरता येऊ शकले नाही.

त्यामुळे हताश झालेले अन्यायग्रस्त शेतकरी महिला व शेतकरी उपाशी तापाशी १२ ते ३ वाजेपर्यंत ऑफिसमध्ये ठाण मांडून बसले होते. या बेजबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. अनिल राऊत, सचिन अंबडकार ,प्रवीण घुले, मनोज सोळंके, नारायण कडू, उदय तराळे, हिरुलाल जयस्वाल, मंगेश लाहोरे, प्रदीप राऊत ,दिनकर नाचणकर, चेतन आतकळ यांनी काम तात्काळ झाले नाही तर आम्ही सर्व शेतकरी आमरण उपोषणाला बसतील असा इशारा दिला आहे. जिल्हाधिकारी शेतकऱ्यांना न्याय देतात काय तसेच अधिकाऱ्यांवर काय कारवाई करतात याकडे गावकऱ्यांचे लक्ष लागले आहे.पावसाळा जवळ असल्याने त्वरित पावले उचलणे आवश्यक आहे.

## लायन्स मिडटाऊन व इलाईटचा कृत्रिम पाय वितरण उपक्रम गौरवास्पद-प्रांतपाल बाजोरिया



**अकोला:** अपघात, गँगरीन अथवा अन्य कारणास्तव आपला पाय गमावणाऱ्या दिव्यांग रुग्णासाठी लायन्स क्लब ऑफ अकोला मिडटाऊन व लायन्स क्लब ऑफ इलाईटचा मोफत कृत्रिम पाय वितरण उपक्रम गौरवास्पद असून इतर सेवाभावी संस्थानी असा उपक्रम साकार करून समाजाची सेवा करण्याचे आवाहन लायन्सचे प्रांतपाल अश्विनकुमार बाजोरिया यांनी केले.लायन्स मिडटाऊन व इलाईटच्या वतीने स्थानीय दुर्गा चौक येथील इंद्रप्रस्थ सभागृहात मोफत जयपुर फूट वितरण शिबिर संपन्न झाले.यात बाजोरिया मार्गदर्शन करीत होते. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून माजी गृहराज्य मंत्री डॉ रणजीत पाटील, डिस्ट्रिक्ट फर्स्ट लेडी सौ. वैशाली बाजोरिया,ज्येष्ठ विधीज्ञ बी.के.गांधी, झोन चेअरमन सुनील जेसवाणी,सौ शशी मुरारका, सहयोगी महेश संतांनी, निरंजन भाला,संयोजक सुभाष चांडक आदी मान्यवर उपस्थित होते.

## महावितरणचा दोन पुरस्कारांनी सन्मान

**अकोला:** मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात राज्याच्या सामाजिक व आर्थिक विकासामध्ये ऊर्जा परिवर्तनाद्वारे दिलेल्या विशेष योगदानाची दखल घेत महावितरणचा 'मागेल त्याला सौर कृषिपंप' योजनेसाठी 'रिन्यूएबल एनर्जी इनिशिएटिव्ह ऑफ द इयर' तसेच प्राधान्य दराच्या वीजखरेदीमध्ये ६५ टक्के स्वस्त व शाश्वत अपारंपरिक ऊर्जेचा समावेश केल्याबद्दल 'क्लीन एनर्जी अँड रिन्यूएबल अडॉप्शन अवॉर्ड'ने गौरविण्यात आले. भविष्यातील सक्षम अर्थव्यवस्था घडविण्यासाठी इकॉनॉमिक टाइम्सने मुंबई येथे दोन दिवसीय महाराष्ट्र बिझनेस परिषदेचे आयोजन केले होते.

## निधन वार्ता

**गजानन उमाळे**



**पातूर:** शिरला अंधारे येथील गजानन उमाळे ५७ यांचे अल्पशा आजाराने २४ रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात आई ,पत्नी, मुलगा, मुलगी व मोठा आप्तपरिवार आहे.

# अकोटमध्ये उद्या गो सन्मानासाठी पदयात्रा

वि.प्रतिनिधी २६ एप्रिल

**अकोट:** अकोट शहरात गोमातेचा सन्मान, संरक्षण व भारतीय संस्कृतीतील गोसेवेचे महत्त्व जनमानसात पोहोचविण्यासाठी 'गो सन्मान आवाहन अभियान' अंतर्गत सोमवार, दिनांक २७ एप्रिल २०२६ रोजी भव्य पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.

या पदयात्रेचा शुभारंभ सकाळी ८.३० वाजता श्री नरसिंग महाराज मंदिर पटांगण येथून होणार असून समारोप तहसील कार्यालय, पोपटखेड रोड, अकोट येथे होणार आहे. शहरातील तसेच परिसरातील गोभक्त, गोप्रेमी, युवक, महिला व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

भारतीय संस्कृतीत गौमातेचे स्थान अत्यंत पूजनीय मानले जाते. गोमाता ही सेवा, समृद्धी, संस्कार आणि सनातन परंपरेचे प्रतीक मानली जाते. शेती, आरोग्य, पर्यावरण आणि ग्रामविकासामध्ये गोधनाचे महत्त्व अनन्यसाधारण असल्याने समाजात गौसंवर्धन व गौरक्षणाबाबत जागृती निर्माण करण्यासाठी हे अभियान राबविण्यात येत आहे.

या अभियानाला आध्यात्मिक अधिष्ठान लाभले असून स्वयं भगवती गोमाता व नंदी महाराज यांच्या प्रेरणेने ही पदयात्रा आयोजित करण्यात आल्याची भावना गोभक्तांमध्ये व्यक्त होत आहे. त्यामुळे या उपक्रमाला विशेष सामाजिक व धार्मिक महत्त्व प्राप्त झाले आहे. मोठ्या संख्येने उपस्थित राहून पदयात्रा यशस्वी करावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# दारूड्याची पत्रकाराच्या मुलाला अश्लिल शिवीगाळ; हातपाय तोडण्याची धमकी

### ◆ दारूड्यांमुळे महिलांना रस्त्यावर चालणे झाले कठीण

प्रतिनिधी २६ एप्रिल




**बार्शीटाकळी:** येथे अवैध धंदे खुलेआम सुरू आहेत. गांजा, देशी दारू, वरली मटक्यावर बंधन नाही. येथे दररोज सिटी न्यूज सुपरफास्टचे वाटप तालुका प्रतिनिधींचा मुलगा रेहान खान आझम खान करतो. काल तहसील कार्यालय समोर देशी दारूच्या दुकानात पेपर देण्याकरिता गेला असता तिथे ग्रीन कॉलनीतील मोहम्मद इर्शाद याने दारूच्या नशेत रेहानला म्हटले की पेपर तू नको टाकत जाऊ पेपर टाकायला तुझ्या आईला पाठव अशी अश्लील भाषा वापरली व हातपाय तोड्याची धमकी दिली. संबंधित व्यक्तीविरुद्ध पोलिस ठाण्यात तक्रार दिली असून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

बार्शीटाकळी मध्ये देशी दारू पानपट्टीवर विकली जात आहे. दारू विक्रेत्यावर कोणाचेही नियंत्रण व धाक नाही. तहसील कार्यालय ते मेन बाजार लेन येथे खुलेआम देशी दारू, मटका मटका चालू आहे. येथील त्रस्त आहेत. येणाऱ्या जाणाऱ्या व्यक्तींना हे लोक दारू पिऊन शिवीगाळ करतात. २५ एप्रिल रोजी सायंकाळी साडेसहा ते सात वाजताच्या सुमारास बार्शीटाकळी तालुका प्रतिनिधी यांचा मुलगा पेपर टाकण्याकरिता गेला असता दारूड्याने आई बहिणीवर शिवीगाळ करून हातपाय तोडण्याची धमकी दिली. सय्यद इर्शाद विरुद्ध तालुका प्रतिनिधी यांनी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केली. पोलिसांनी या व्यक्तीवर भारतीय न्याय संहिता बीएनएस २०२३ नुसार ३५२ व ३५१,२ गुन्हा दाखल केला आहे.

# अकोला महापालिका क्षेत्रात 'आपले सरकार सेवा केंद्र'साठी अर्ज मागविले

प्रतिनिधी २६ एप्रिल

**अकोला:** जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या वतीने अकोला महानगरपालिका क्षेत्रातील 'आपले सरकार सेवा केंद्र' चालविण्यासाठी एकूण २१ केंद्रांसाठी भरती प्रक्रिया जाहीर करण्यात आली आहे. या अंतर्गत विविध प्रभागांमध्ये रिक्त असलेल्या केंद्रांसाठी इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयाकडून जारी करण्यात आलेल्या जाहिरातीनुसार, इच्छुक उमेदवारांनी दि. २७ एप्रिल ते ८ मे २०२६ या कालावधीत अधिकृत संकेतस्थळ ".व्दर्ट्ुदन्.ग्ह वरून अर्ज डाउनलोड करून आवश्यक कागदपत्रांसह जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे. अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत ८ मे २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत निश्चित करण्यात आली आहे. प्राप्त अर्जांची छाननी करून पात्र उमेदवारांची यादी जाहीर करण्यात येणार असून, त्यानंतर मुलाखत प्रक्रिया ४ व ५ जून २०२६ रोजी पार पडणार आहे. अंतिम निवड यादी १० जून २०२६ रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे. या भरती प्रक्रियेसाठी उमेदवार किमान १८ वर्षे पूर्ण असणे आवश्यक असून, किमान १२ वी उत्तीर्ण, संगणकाचे ज्ञान आणि मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असणे गरजेचे आहे. तसेच, संबंधित प्रभागातील रहिवासी असणे आवश्यक आहे. याशिवाय, अर्जासोबत आधार कार्ड, पॅन कार्ड, रहिवासी प्रमाणपत्र, शैक्षणिक कागदपत्रे आणि पोलिस चारित्र्य प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. अधिक माहितीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाने नागरिकांना अधिकृत संकेतस्थळाला भेट देण्याचे आवाहन केले आहे. इच्छुकांनी वेळेत अर्ज करून या संधीचा लाभ घ्यावा, असेही प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

# सौर कंपनीच्या अधिकाऱ्यांच्या मनमानीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान - शेतकरी संघटनेचा आरोप

प्रतिनिधी २६ एप्रिल



**तेल्हारा:** तालुक्यातील सोलर प्लांट परिसरात कंपनीच्या बेजबाबदार अधिकाऱ्यांमुळे शेतकरी उदध्वस्त झाला आहे. याबाबत शेतकरी संघटनेने तीव्र संताप व्यक्त केला आहे.

नैसर्गिकरित्या तलावात जाणारे वहिवाटीचे पाणी सौर ऊर्जा प्लांटचे अधिकारी नरसिंग ठाकूर व रतन घोष यांनी जाणूनबुजून शेतकऱ्यांच्या शेतात वळवले. यामुळे यावर्षी प्लांटच्या आजूबाजूची शेकडो एकर शेती पूर्णपणे खरडून गेली व शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. शासनाच्या ङजलयुक्त शिवार योजनेतून निर्माण केलेले मोठे तलाव हे केवळ वहिवाटीच्या पाण्यानेच भरले पाहिजेत. परंतु कंपनीने पाण्याचा नैसर्गिक मार्गच बंद केल्यामुळे तलाव कोरडा पडला असून या भागातील शेतकऱ्यांचे सिंचन पूर्णपणे ठप्प झाले आहे. सामाजिक वनीकरण विभागामार्फत सर्व्हे नंबर २४५ या शिवारात लावलेली हजारो झाडे कंपनीने बेकायदेशीरपणे तोडून टाकली. हा पर्यावरणाचा मोठा घात आहे.

या सर्व गंभीर बाबींची दखल घेऊन तहसीलदार राम गुंडे व मंडळ अधिकारी सुधाकर सोनवणे यांनी प्रत्यक्ष सोलर प्लांटच्या जागेची पाहणी केली. यावेळी शेतकरी बांधवांनी आपली कैफियत मांडली.

शेतकरी संघटनेचे विदर्भ अध्यक्ष लक्ष्मीकांत कोठकर, तालुका अध्यक्ष निलेश नेमाडे, गोपाल चांडक, पदाधिकारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. चर्चेअंती तहसीलदार राम गुंडे यांनी सर्व समस्यांचे सात दिवसात समाधान केले जाईल असे आश्वासन शेतकरी संघटनेच्या शिष्टमंडळाला दिले.सात दिवसात मागण्या मान्य झाल्या नाहीत तर आंदोलनाचा इशारा कौठकर यांनी दिला आहे.

# माहेश्वरी महिला संघटनेच्या नव्या कार्यकारिणीची घोषणा; पदग्रहण सोहळा उत्साहात

वि.प्रतिनिधी २६ एप्रिल



**अकोट :** अकोला जिल्हा माहेश्वरी महिला संघटनेच्या दशम सत्रासाठी नव्या कार्यकारिणीची घोषणा उत्साहात करण्यात आली असून, जिल्हाध्यक्षपदाची धुरा शारदा नवनीत लखोटिया यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे संघटनेला नवचैतन्य मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. नूतन कार्यकारिणीत सचिवपदी आरती पुरुषोत्तम पनपालिया तर कोषाध्यक्षपदी रेखा प्रमोद चांडक यांची निवड करण्यात आली आहे. या सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा भव्य पदग्रहण सोहळा अकोट येथील सेंट पॉल पब्लिक स्कूलमध्ये आयोजित करण्यात आला असून, या निमित्ताने माहेश्वरी समाजाची एकजूट दिसून येणार आहे.

या सोहळ्यास विदर्भ प्रादेशिक माहेश्वरी महिला संघटनेच्या अध्यक्षा नीलिमा मंत्री (यवतमाळ) प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच अखिल भारतीय माहेश्वरी महिला संघटनेच्या मध्यांचल विभागाच्या संयुक्त मंत्री भारती राठी (आर्वी) यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमात विदर्भ प्रादेशिक संघटनेच्या माजी अध्यक्षा तारा माहेश्वरी व ज्योती बाहेती या देखील उपस्थित राहून नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. जिल्ह्यातील सर्व तालुक्यांतील पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने या कार्यक्रमात सहभागी होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

# जागतिक हिवताप दिनानिमित्त जिल्ह्यात विविध उपक्रम

प्रतिनिधी २६ एप्रिल




**अकोला :** जागतिक हिवताप दिन निमित्त अकोला जिल्ह्यात विविध उपक्रमांच्या माध्यमातून हिवतापाबाबत व्यापक जनजागृती करण्यात आली. जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली हा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त जिल्ह्यात प्रदर्शन, रांगोळी स्पर्धा, निबंध स्पर्धा, वृत्तपत्र लेखन, गटसभा तसेच जनजागृती रॅलीचे आयोजन करून नागरिकांना आरोग्य शिक्षण देण्यात आले. सोशल मीडियाच्या माध्यमातूनही मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्यात आली. तसेच डासांची अळी नियंत्रण व गप्पी मासे प्रात्यक्षिकाद्वारे नागरिकांना प्रत्यक्ष माहिती देण्यात आली.

याच उपक्रमांचा एक भाग म्हणून अकोला शहरातील हरिहर पेठ येथील नागरी आरोग्य केंद्राच्या वतीने जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीस सहाय्यक संचालक आरोग्य सेवा (हिवताप) अकोला मंडळाचे डॉ. अन्सारी, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. अतुल शंकरवार तसेच वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. रुची पोहुरकर यांचे मार्गदर्शन लाभले.

रॅलीची सुरुवात नागरी आरोग्य केंद्र हरिहर पेठ येथून होऊन हरिहर पेठ मुख्य चौकात समारोप करण्यात आला. समारोपावेळी उपस्थित नागरिकांना मलेरियाबाबत सविस्तर माहिती देत आरोग्य शिक्षण करण्यात आले.

या रॅलीमध्ये Institute of Nursing Education and Reserch (INER), Akola येथील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. संस्थेच्या प्रमुख मीना माहोरे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी जनजागृतीत सक्रिय भूमिका बजावली. यावेळी अवैद्यकीय आरोग्य अधिकारी श्री. सुधीर चव्हाण यांचीही प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमात हरिहर पेठ येथील आरोग्य निरीक्षक अनिल गिरी, आरोग्य कर्मचारी करण घुगे व विनोद मनोहरे, जीएनएम विजया नवघरे, फार्मासिस्ट मोनिका रायसिंग, लॅब टेक्निशियन अंकुश धुड, तसेच आरोग्य सेविका कल्पना बोबडे, प्रिया हागोने, वर्षा गणगणे आणि आशा वर्कर मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

रॅलीदरम्यान 'गप्पी मासे पाळा, हिवताप टाळा', 'स्वच्छता ठेवा, मलेरिया दूर ठेवा', 'येता कणकण तापाची करा तपासणी रक्ताची' आणि 'कोणताही ताप असू शकतो हिवताप' अशा घोषणा दिल्या. सदर कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला असून, या उपक्रमासाठी शुभम पजई, सोनाली डोंगरे तसेच टीचिंग स्टाफ यांनी विशेष सहकार्य केले.

समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचालित एफ ५२२६
मॉं. गायत्री प्राथमिक शाळा व
स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय
गायत्री नगर. अकोला
आम्ही गुणवत्ता पाहून प्रवेश देत नाही तर,
प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकामध्ये गुणवत्ता निर्माण करतो!
वैशिष्ट्ये :
1)अनुभवी शिक्षकवृंद
2)सुसज्ज पायाभूत ईमारत
3)दर्जेदार अभ्यासक्रमासोबत नाविण्यपूर्ण उपक्रम
4)सर्व पुस्तकांनी युक्त वाचनालय
5)आनंददायी शिक्षण पध्दती
6)CCTV ची सुविधा
7)कला, संस्कृती, क्रिडा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासावर भर
8)सुसज्ज प्रयोगशाळा
इयत्ता 1 ली ते 10 वी साठी प्रवेश देणे सुरू आहे.
1)इयत्ता 1 ली ते 8 वी च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश
2)इयत्ता 1 ली ते 10 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत बससेवा उपलब्ध
3)शालेय पोषण आहार

माँ गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय
मो. 9921186715, 9511254959, 9421895790, 9960437366

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
रविवार, दि. २६ एप्रिल २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# गुप्तधनाच्या मोहात जादूटोणा; सहा जण पोलिसांच्या जाळ्यात

प्रतिनिधी २६ एप्रिल




**यवतमाळ** : गुप्तधन मिळविण्याच्या मोहात जादूटोण्याचा अवलंब करणाऱ्या सहा जणांविरुद्ध वडगाव (जंगल) पोलिसांनी कारवाई करत गुन्हा दाखल केला आहे. ही घटना २५ एप्रिलच्या मध्यरात्री रात्रगस्ती दरम्यान उघडकीस आली.

पोलीस पथक वरुड ते कारेगाव मार्गावर गस्त घालत असताना संशयास्पद स्थितीत उभी असलेली चारचाकी (एमएच ०१ बीएफ ६०२६) आढळून आली. वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये जादूटोण्याशी संबंधित विविध साहित्य आढळून आले.

जप्त साहित्यामध्ये लोखंडी साधने, अगरबत्ती, ज्वारीचे पीठ, काळ्या कपड्यांच्या बाहुल्या, त्रिशूल, रुद्राक्ष माळ, लिंबू, केस, सुया, ताबीज तसेच रंगीबेरंगी धागे यांचा समावेश आहे. पोलिसांनी चौकशी केली असता संशयितांनी जमिनीत गुप्तधन शोधण्यासाठी आल्याची कबुली दिली.

या प्रकरणी अशोक रामधन राठोड, रितेश रवि भगत, लिलेश्वर विश्वनाथ बावणे, कुंदन दारासिंग राठोड, विरेंद्र रमेश गायकवाड (सर्व रा. आमगव्हाण, कारखेडा, हरदा, वाई गौळ, ता. मानोरा, जि. वाशीम) तसेच राजेश केशव राठोड (रा. बोरगाव, ता. आर्णी, जि. यवतमाळ) यांच्याविरुद्ध महाराष्ट्र नरबळी व इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंधक कायदा २०१३ अंतर्गत कलम ३ (१), (२) व (३) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

दरम्यान, पोलिसांनी घटनास्थळावरून सुमारे ३ लाख रुपये किमतीची महिंद्रा एक्सयूव्ही चारचाकी तसेच जादूटोण्याचे साहित्य जप्त केले आहे. ही कारवाई ठाणेदार विकास दांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस पथकाने केली असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक भाऊराव बोकडे करीत आहेत.

# आयपीएल सामन्यावर ऑनलाईन सट्टा; करंजीत पोलिसांची धाड, ९ जणांविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी २६ एप्रिल

**यवतमाळ** : पांढरकवडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या करंजी येथे आयपीएल क्रिकेट सामन्यावर ऑनलाईन सट्टा सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी छापा टाकून कारवाई केली. या प्रकरणी नऊ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून ९६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, Indian Premier League अंतर्गत Royal Challengers Bangalore विरुद्ध Gujarat Titans या सामन्यावर पैशांची हार-जीत लावून ऑनलाईन सट्टा खेळविला जात असल्याची खात्रीलायक माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक नितीन सुशिर यांनी पोलीस निरीक्षक एल. डी. तावरे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकासह करंजी येथे छापा टाकला.

या कारवाईत शशांक दिवाकर मुडे (२६), मंगेश विनायक खांदनकर (२७) आणि नंदू हिरालाल कांबळे (२७, सर्व रा. करंजी) हे ऑनलाईन सट्टा खेळविताना आढळून आले. त्यांच्या ताब्यातून चार मोबाईल फोनसह एकूण ९६,०१० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी अन्य आरोपी म्हणून बाळू पाटील, प्रणय वानखडे, ईश्वर अक्कलवार, पवन बांधुरकर (रा. कोठोडा), बुद्धराज पुडके (रा. करंजी) तसेच सट्ट्याची उतारी घेणारा विक्की श्रावणकुमार अरोरा (रा. पुलगाव, जि. वर्धा) यांचा समावेश आहे. सर्व आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२(अ) तसेच भारतीय न्याय संहिता कलम ३(५), ४९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी रॉबिन बंसल यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. गुन्हे शोध पथकातील पोलिसांनी ही कारवाई यशस्वी केली.

# यवतमाळ जिल्ह्याचा पिक विम्यात समावेश करण्याची मागणी

प्रतिनिधी २६ एप्रिल



**पुसद** : अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी यवतमाळ जिल्ह्याचा पिक विमा योजनेत तातडीने समावेश करावा, अशी मागणी शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने करण्यात आली आहे. या संदर्भात उपविभागीय अधिकारी आशीष बिजवल यांना लेखी निवेदन सादर करण्यात आले.

विमा कंपनी व संबंधित यंत्रणांनी जिल्ह्याचा लवकरात लवकर समावेश न केल्यास सनदशीर मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला. निवेदनात अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून गुरे-जनावरांचीही जिवितहानी झाल्याची माहिती देण्यात आली. त्यामुळे शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत व पिक विम्याचा लाभ मिळणे अत्यावश्यक असल्याचे नमूद करण्यात आले.

यावेळी तहसीलदार रेखा मोहिते वाणी उपस्थित होत्या. तसेच हे निवेदन यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड, नामदार इंद्रनील नाईक, जिल्हाधिकारी तसेच जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांना पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले आहे.

या वेळी शेतकरी संघर्ष समितीचे जैनुल सिद्दीकी, रामकृष्ण चंदेल, दत्ता हजारे, बाळासाहेब (बिटी) देशमुख, रमेश बैस, राजकुमार देशमुख, विठ्ठल देशमुख, शेख अबरार आणि रमेश सोळंके आदी उपस्थित होते.

# कृषी निविष्ठा विक्रेत्यांचा २७ एप्रिलपासून बेमुदत बंदचा इशारा

प्रतिनिधी २६ एप्रिल



**महागाव** : राज्यातील कृषी निविष्ठा विक्री व व्यवसायासंदर्भातील प्रलंबित प्रश्नांकडे कृषी विभागाकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत महागाव तालुक्यातील कृषी केंद्र चालकांनी २७ एप्रिल २०२६ पासून बेमुदत बंद आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

महाराष्ट्र फर्टीलायझर्स पेस्टिसाइड डीलर्स असोसिएशन (महाराष्ट्र राज्य) शाखा महागावच्या वतीने हा निर्णय घेण्यात आला. या पार्श्वभूमीवर २४ एप्रिल रोजी तहसीलदार तसेच तालुका कृषी अधिकारी यांना निवेदन सादर करण्यात आले. यावेळी तालुक्यातील मोठ्या संख्येने कृषी विक्रेते, संचालक व व्यावसायिक उपस्थित होते.

निवेदनात व्यवसायातील विविध अडचणी, प्रलंबित मागण्या तसेच प्रशासनाकडून होत असलेल्या कार्यवाहीतील विलंब यांचा उल्लेख करण्यात आला आहे. या मागण्यांवर तातडीने निर्णय न घेतल्यास २७ एप्रिलपासून बेमुदत बंद आंदोलन सुरू करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

या संभाव्य बंदचा फटका तालुक्यातील शेतकऱ्यांना बसण्याची शक्यता व्यक्त होत असून, प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून तोडगा काढावा, अशी मागणी विक्रेत्यांकडून करण्यात आली आहे.

# तीन महिला उमेदवार रिंगणात; २०६५ मतदार करणार सरपंच निवड

प्रतिनिधी २६ एप्रिल

झरी जामणी : माथार्जुन ग्रामपंचायतीतील सरपंच पद अपात्र ठरल्याने रिक्त झालेल्या जागेसाठी पुन्हा निवडणूक जाहीर करण्यात आली असून, यावेळी तीन महिला उमेदवार रिंगणात उतरल्याने लढत रंगतदार ठरण्याची चिन्हे आहेत.

सरपंचाची थेट जनतेतून निवड होणार असल्याने या निवडणुकीकडे ग्रामस्थांचे विशेष लक्ष लागले आहे. येत्या २८ एप्रिल रोजी मतदान होणार असून गावात निवडणुकीचे वातावरण तापू लागले आहे. तिन्ही उमेदवारांनी प्रचाराला वेग देत मतदारांपर्यंत पोहोचण्यावर भर दिला आहे.

या निवडणुकीत एकूण २०६५ मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. त्यामध्ये १०४८ महिला व १०१७ पुरुष मतदारांचा समावेश आहे. मतदानासाठी जिल्हा परिषद शाळा, माथार्जुन येथे तीन मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे.

# ढाणकीत अवैध धंद्यांचा सुळसुळाट

प्रतिनिधी २६ एप्रिल

**उमरखेड** : बिटरगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या ढाणकी शहरात अवैध धंद्यांचा सुळसुळाट वाढला असून, या प्रकरणी स्थानिक पोलीस प्रशासनावरच संगनमताचे गंभीर आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहेत. ठाणेदारांच्या पाठीशी असल्यामुळेच हे प्रकार बिनधास्त सुरू असल्याची चर्चा शहरात रंगू लागली आहे.



शहरातील प्रमुख व गजबजलेल्या भागात उघडपणे सुरू असलेल्या जुगार अड्ड्यांमुळे पोलीस व अड्डा चालक यांच्यातील कथित आर्थिक संबंधांचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. तीन पत्ती, मटका तसेच ऑनलाईन (चक्री) जुगारासह विविध अवैध धंद्यांनी शहरात अक्षरशः थैमान घातल्याचे चित्र आहे.

### उपविभागीय कार्यालय असूनही परिणाम शून्य?

■ तालुक्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी उमरखेड येथे उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय स्थापन करण्यात आले. मात्र, या कार्यालयाचा अपेक्षित परिणाम दिसून येत नसल्याने अवैध धंदे चालकांचेच फावते असल्याची टीका नागरिकांकडून केली जात आहे.

स्थानिकांच्या मते, या वाढत्या गैरप्रकारांमुळे गुन्हेगारी घटनांमध्ये वाढ होत असून नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होत आहे. मात्र, यावर स्थानिक पोलीसांकडून ठोस कारवाई होत नसल्याची नाराजी व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा पोलीस अधीक्षकांनी तातडीने लक्ष घालून ढाणकीतील अवैध धंद्यांवर कायमस्वरूपी आळा घालावा, अशी मागणी जोर धरत आहे.

### धाडसी कारवाईचा दाखला, तरी ढाणकीकडे दुर्लक्ष?

■ उमरखेडजवळील बेलखेड शिवारात नुकत्याच स्थानिक गुन्हे शाखेने जुगार अड्ड्यावर छापा टाकून लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. मात्र ढाणकीसारख्या गजबजलेल्या ठिकाणी अनेक अड्डे सुरू असतानाही त्याची माहिती न मिळाल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

# विहिरीत शेतकऱ्याचा मृतदेह आढळला

प्रतिनिधी २६ एप्रिल

**उमरखेड** : तिवडी शेतशिवारात कर्जबाजारी शेतकऱ्याने विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली. प्रभाकर पुंजाराम खंदारे (62, रा. तिवडी) असे मृताचे नाव आहे. ते 20 एप्रिल रोजी घरातून उमरखेडला जातो असे सांगून निघाले होते, मात्र परत न आल्याने मिसिंग तक्रार दाखल करण्यात आली होती. 23 एप्रिल रोजी विहिरीत मृतदेह आढळल्याची माहिती मिळताच पोलीस व ग्रामस्थांनी तो बाहेर काढला. वैद्यकीय तपासणीत मृत घोषित करण्यात आले.

# रेल्वे गेट अंडरपास वाद चिघळला

प्रतिनिधी २६ एप्रिल



**झरी:** खडकी-अडेगाव मार्गावरील रेल्वे गेट क्रमांक 16 येथे प्रस्तावित अंडरपासवरून वाद चिघळला असून परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. स्थानिक नागरिक, ग्रामपंचायत प्रतिनिधी आणि औद्योगिक क्षेत्रातील उद्योजकांनी अंडरपासला विरोध दर्शवत "अंडरपास नको, रोड ओव्हर ब्रिजच हवा" अशी ठाम भूमिका घेतली आहे.

24 एप्रिल रोजी झालेल्या संयुक्त तपासणीत 5.5 मीटर x 4.5 मीटर आकाराचे बॉक्स स्ट्रक्चर उभारण्यात आल्याचे समोर आले. मात्र डोलोमाइट व लाइमस्टोन उद्योगांतील जड व उंच वाहनांसाठी ही उंची अपुरी असल्याचे स्पष्ट झाले. रेल्वे प्रशासनाने 5 मीटर x 5 मीटर दुहेरी बॉक्सचा पर्याय सुचवला, मात्र उद्योग संघटनांनी किमान 6.5 मीटर उंचीची मागणी करत तो प्रस्ताव नाकारला. रेल्वे प्रशासनाने ही मागणी अव्यवहार्य असल्याचे सांगितले आहे. दरम्यान, अडेगाव परिसरातही अंडरपासला तीव्र विरोध वाढला असून सरपंच गंगा काटकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे सुमारे 4,500 नागरिकांच्या उपजीविकेवर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली आहे. पावसाळ्यात पाणी साचणे, वाहतूक अडथळे, शेती व आपत्कालीन सेवांवर परिणाम होण्याचा धोका ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे. या पार्श्वभूमीवर ओव्हरब्रिजची मागणी अधिक तीव्र झाली आहे. पर्यायी व्यवस्था होईपर्यंत विद्यमान लेव्हल क्रॉसिंग सुरू ठेवण्याची मागणीही पुढे आली आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी सर्व मागण्या नागपूर रेल्वे विभागाकडे पाठवल्या आहेत.

# खंडाई रस्त्याची दयनीय अवस्था; अपघातांची मालिका सुरूच

प्रतिनिधी २६ एप्रिल

**दिग्रस** : शहरातील खंडाई रस्त्याची अवस्था दिवसेंदिवस खालावत चालली असून नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले असून धूळ, चिखल आणि साचलेल्या पाण्यामुळे परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे.

या मार्गावरून दररोज प्रवास करणाऱ्या नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. वाहन चालवताना तोल जाणे, दुचाकी घसरून पडणे यांसारख्या घटना नित्याच्या झाल्या असून छोटे-मोठे अपघात सातत्याने घडत आहेत.

नागरिकांनी याबाबत संबंधित प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही अद्याप कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नसल्याने स्थानिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. सध्याची परिस्थिती अशी आहे की वाहन चालवणे तर दूरच, पायी चालणे देखील धोकादायक ठरत आहे. विशेषतः वृद्ध, महिला आणि विद्यार्थ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करून खड्डे बुजवावेत तसेच कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अन्यथा आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा नागरिकांकडून देण्यात आला आहे.



# गोदावरी अर्बनचे कार्य अर्थव्यवस्थेला बळ देणारे : पालकमंत्री डॉ. पंकज भोयर

प्रतिनिधी २६ एप्रिल




**यवतमाळ** : ग्रामीण भागातील आर्थिक प्रगतीसाठी सहकार क्षेत्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, गोदावरी अर्बनचे कार्य अर्थव्यवस्थेला बळ देणारे असल्याचे गौरवोद्गार सहकार, गृहनिर्माण व शालेय राज्यमंत्री तथा पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी काढले.

गोदावरी अर्बनच्या वर्धा शाखेच्या चौथ्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी संस्थापक अध्यक्ष नामदार हेमंत पाटील, अध्यक्ष राजश्री पाटील, नगराध्यक्ष सुधीर पांगुळ, अप्पर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

पालकमंत्री डॉ. भोयर म्हणाले की, ग्रामीण भागातील शेतकरी, कष्टकरी, लघुउद्योजक व सर्वसामान्य नागरिकांना आर्थिक पाठबळ देण्याचे महत्त्वाचे कार्य सहकारी संस्था करतात. गोदावरी अर्बनची वाटचाल ही समाजातील वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणणारी असून संस्थेचे कार्य दिशादर्शक आहे. वर्धा परिसरात आणखी शाखा सुरू करून अधिकाधिक नागरिकांपर्यंत सेवा पोहोचवावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

संस्थेच्या अध्यक्षा राजश्री पाटील यांनी सांगितले की, ज्यांची आर्थिक पत नाही त्यांची पत निर्माण करण्याच्या उद्देशाने संस्थेची स्थापना करण्यात आली असून, सभासद आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावेत यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत.

कार्यक्रमात व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर यांनी संस्थेच्या विस्ताराची माहिती देत, देशातील सहा राज्यांमध्ये कार्यक्षेत्र विस्तारल्याचे सांगितले. तसेच आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जलद कर्ज वितरण व सुलभ सेवा दिली जात असल्याचेही त्यांनी नमूद केले. यावेळी उत्कृष्ट ठेवीदार व व्यवस्थापन कार्यासाठी विविध शाखा व अधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन उप सरव्यवस्थापक रवी इंगळे यांनी केले.

# करिअर बनवण्यासाठी ध्येयावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक – डॉ. यादवराव राऊत

प्रतिनिधी २६ एप्रिल




**उमरखेड** : विद्यार्थ्यांनी स्वप्न पाहिले पाहिजे आणि ते सत्यात उतरण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. करिअर बनवण्यासाठी ध्येयावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन यवतमाळ जिल्हा अखिल कुणबी समाज संस्थेचे सचिव डॉ. यादवराव राऊत यांनी केले. येथील गोपिकाबाई सीताराम गावंडे महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पदवी वितरण समारंभात अध्यक्ष स्थानावरून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

मोठी स्वप्ने पाहून मोठे व्हा, आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित करा, आयुष्यामध्ये अपयशाने खचून जाऊ नका, ज्यांच्यामध्ये जिद्द असते; ते विद्यार्थी जग जिंकतात. त्यामुळे चांगल्या- वाईट गोष्टी समजून घ्या, मुलींनी रोज घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीची कल्पना आपल्या आईला दिली पाहिजे, असे मार्गदर्शन संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सदस्य प्रा. डॉ. विद्या शर्मा यांनी प्रमुख अतिथी म्हणून केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ गीत सादर करण्यात आले. प्राचार्य डॉ. माधव कदम यांनी आपल्या प्रास्ताविकातून महाविद्यालयातील प्रगतीचा चढता आलेख सादर केला आणि विद्यार्थ्यांनी आपले करिअर घडवण्यासाठी आपल्या विषयातील स्पर्धेचा अंदाज घेऊन वेळेचे व्यवस्थापन करावे असे प्रतिपादन केले. मागील शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये उत्तीर्ण झालेल्या महाविद्यालयातील पदवी आणि पदव्युत्तर विभागातील विद्यार्थ्यांना याप्रसंगी पदवी वितरण करण्यात आले. तसेच या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयातील अकरा प्राध्यापकांना पेटंट मिळाल्याबद्दल त्यांचा प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

प्रा. डॉ. विजय कदम, प्रा. डॉ. धनराज तायडे याप्रसंगी उपस्थित होते. बी.ए. अंतिम वर्षाचे विद्यार्थी प्राची चवरे आणि वैभव ठाकरे या विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून आभार मानले.

राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमाची समन्वयक प्रा. डॉ. पांडुरंग जाधव यांच्या मार्गदर्शनात महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
रविवार दि. २६ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## फोकस

● अतिष देशमुख @ वाशीम ●




●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

आकांक्षीत जिल्हा म्हणून वाशीम जिल्ह्याची नोंद आहे. सिंचनाचा अनुशेष देखील मोठ्या प्रमाणात आहे. नविन मोठेएकही प्रकल्प जिल्हयात आला नाही. शिवाय प्रकल्प आणण्यासाठी एकाही लोकप्रतिनिधीनी पुढाकार घेतला नाही. यावर कळस म्हणजे सिंचन विभागाला भ्रष्टाचाराने बरबटले असतांना सरकारने जिल्ह्यातील पाटबंधारे प्रकल्प मंडळ कार्यालय शेगाव येथे स्थलांतरित करून जिल्ह्यावर अन्याय केला आहे. तर अतिवृष्टीमुळे शेतीतील पिकेच नव्हे तर संपूर्ण नदी व नाल्याकाठची शेतीतील माती खरडून गेली. शेतीच नष्ट झाली. सुरूवातीला अतिवृष्टीच्या मदतीतून जिल्हा वगळला नंतर समाविष्ट केला. तरी सुध्दा अद्यापही बळीराजा मदतीच्या प्रतिक्षेतच आहे. नदी जोड प्रकल्पातून वाशीम जिल्ह्याला वगळले असून अद्यापही नदी जोड प्रकल्पात जिल्ह्याचा समावेश झाला नाही. अमरावती विद्यापिठाचे उपकेंद्र वाशीमला व्हावे यासाठी ३० वर्षापासून सामाजिक संघटनेसह राजकारण्यांनी पुढाकार घेतला होता. त्याचेही प्रयत्न असफल झाले. आता विद्यापीठ उपकेंद्र अकोलाला होणार असल्याचे जाहीर झाल्याने आपले लोकप्रतिनिधी किती निष्क्रीय आहे हे सिध्द झाले.शहरातून जाणारा अकोला - नांदेड रस्ता चौपदरी ऐवजी दुपदरीच होत आहे. जिल्ह्यात एमआयडीसी भकास झाली असून मुलभूत सुविधांचा अभाव आहे. जिल्ह्यातील शहरासह ग्रामीण भागातील रस्ते खड्ड्यात गेले आहेत. योजना खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचल्याच नाहीत. त्यामुळे जिल्ह्याचा आकांक्षीत जिल्हा म्हणून असलेला कलंक पुसण्यासाठी आलेला निधीही भ्रष्टअधिकाऱ्यांमुळेच खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचतच नाही. अर्थसंकल्प अधिवेशनातही जिल्ह्याला काहीच मिळाले नाही. लोकप्रतिनिधींनीही काहीच केले नाही .

# कधी मिळणार न्याय
# जिल्ह्यावर अन्याय !



* रस्ता चौपदरी नव्हे तर होतोय दुपदरी
* भ्रष्टाचार निरंतर, पाटबंधारे मंडळाचे स्थलांतर
* अमरावती विद्यापिठ उपकेंद्राची लढाई व्यर्थ
* नदीजोड प्रकल्पातून वाशीम जिल्हा वगळला







आकांक्षीत जिल्हा म्हणून ओळख असलेल्या वाशिम जिल्ह्याच्या पदरी पुन्हा एकदा निराशाच आली असून वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पातून वाशिम जिल्हा वगळण्यात आला आहे. त्यामुळे सिंचनाचा अनुशेष भरून निघण्याची शेतकऱ्यांची आशा मावळली आहे. कारण अधिवेशनातही बैठक आणि चर्चा घेवून कोणताही ठोस निर्णय झाला नाही. नदी जोड प्रकल्पात जिल्ह्याचा समावेश झाल्याचे पोस्टर लावून चमकोगिरी करणारे नेते मात्र आता तोंडघशी पडले असून जिल्ह्यातील राजकारण्यांची निष्क्रियता पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे. विदर्भातील वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प हा राज्यस्तरीय नदीजोड प्रकल्प प्रस्तावित असून या प्रकल्पाव्दारे वैनगंगा नदीवरील भंडारा जिल्हयातील गोसीखुर्द प्रकल्पात पावसाळ्यात उपलब्ध होणारे पाणी वैनगंगा उपखोऱ्यातून पुर्णा-तापी खोऱ्यातील बुलढाणा जिल्हयातील नळगंगा प्रकल्पापर्यंत नदीजोड कालव्याद्वारे वळविणे प्रस्तावित आहे. या कालव्याव्दारे विदर्भातील नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा ह्या सहा जिल्ह्यातील १५ तालुक्यातल्या एकूण ३७१२७७ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे. सदर प्रकल्पाची जलसंपदा विभागाच्या सन २०२२-२३ च्या दरसूचीनुसार प्रकल्पाची किंमत रु.८८,५७५ कोटी इतकी आहे. पूर्वी या प्रकल्पात वाशिम जिल्ह्याचाही समावेश नव्हता आता मुख्यमंत्री दुसऱ्या टप्प्यात वाशीम जिल्ह्याचा समावेश करण्याचे आश्वासन २८ नोव्हेंबरच्या सभेत दिले यावरून जिल्ह्याचा नदीजोड प्रकल्पात समावेश नव्हता हे सिध्द झाले आहेत. आताही अधिवेशनात बैठकीचे सत्र सुरू असून आकांक्षीत जिल्ह्याला फक्त बैठका व आश्वासनावरच ठेवले आहे. जिल्ह्याकडे पुर्णपणे दुर्लक्ष केले आहे.विदर्भातील हिवाळी अधिवेशनात जिल्ह्याच्या विविध प्रश्नांवर चर्चा होवून निर्णय होतील अशी अपेक्षा होती. मात्र, अधिवेशनात जिल्ह्याला कोणताच मोठा फायदा झाला नाही. कुठल्या प्रकारचे ठोस निर्णय न झाल्याने आकांक्षीत जिल्ह्याला दुर्लक्षीत करत उपेक्षीत ठेवण्यात आले आहे. आकांक्षीत जिल्हा म्हणून सर्वप्रथम वाशीम जिल्ह्याचा विकासाच्या दृष्टीने विचार व्हावा यासाठी जिल्ह्यातील नेत्यांनी पुढे येणे गरजेचे आहे. निव्वळ पत्र आणि आश्वासन देवून आशेवर ठेवणे म्हणूजेच जिल्हा वासियांची फसवणूक करणे आहे. आजपर्यंत कोणतेच मोठे प्रकल्प आले नाहीत. आले तर ते होवू दिले नाहीत. जे जिल्ह्यात आहे ते इतर जिल्ह्यात नेल्या जात आहे. रस्तेही भ्रष्टाचाराने खड्ड्यात गेले आहेत.







## जिल्ह्यात भ्रष्टाचार निरंतर, पाटबंधारे मंडळाचे स्थलांतर...

मागास जिल्हा म्हणून वाशीम जिल्ह्याची नोंद आहे. सिंचनाचा अनुशेष देखील मोठ्या प्रमाणात आहे. नविन मोठेएकही प्रकल्प जिल्हयात आला नाही. शिवाय प्रकल्प आणण्यासाठी एकाही लोकप्रतिनिधीनी पुढाकार घेतला नाही. यावर कळस म्हणजे सिंचन विभागाला भ्रष्टाचाराने बरबटले असतांना सरकारने जिल्ह्यातील पाटबंधारे प्रकल्प मंडळ कार्यालय शेगाव येथे स्थलांतरित करून जिल्ह्यावर अन्याय केला आहे. याविरोधात जिल्ह्यातील आमदार, खासदार व पुढाऱ्यांनी दिखावा म्हणुन तीव्र विरोध केला. तरीही, २७ ऑक्टोंबर २०२३ रोजी मंडळ कार्यालयाचे शेगाव येथे उद्घाटन संपन्न झाले. आता साप गेल्या नंतर काडया मारण्यात काय अर्थ अशी चर्चा होत आहे. खुदद नितिन गडकरींनीही जिल्हयातील अधिका-यांच्या लक्ष्मी दर्शनाच्या लालसेमुळे व लोकप्रतिनिधीच्या निष्कीये ते मुळे अनेक प्रकल्प रखडल्याचे एक दोन वेळा नव्हे तर तीन वेळा जाहिर सभेत म्हटले आहे.

जिल्ह्यातील पाणी टंचाई व दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन सन २००८ मध्ये




वाशीम जिल्ह्यात मंडळ कार्यालयाची स्थापना करण्यात आली होती. त्यामुळे सिंचन क्षमता वाढीस मदत झाली. परंतु महाराष्ट्र शासन जल संपदा विभागाने २३ ऑक्टोंबर रोजी शासन निर्णय काढून मंडळ कार्यालय स्थलांतर करण्याचा निर्णय घेतला. ही बाब मागास आणि अकांक्षीत असलेल्या वाशीम जिल्ह्यासाठी अन्यायकारक असून आमदार, खासदार आजी माजी हे नेते पुढे आले. त्यांनी मुख्यमंत्री उपमुख्यमंत्र्यांकडे वरिष्ठ स्तरावर प्रयत्न करणार असल्याचे माध्यमांना सांगितले होते. त्यांचे प्रयत्न व्यर्थ गेले. तरी देखील जिल्ह्यातील पाटबंधारे प्रकल्प मंडळ कार्यालय बुलडाणा जिल्ह्यातील शेगाव येथे स्थलांतरित करण्यात आले. २७ ऑक्टोंबर २०२३ रोजी मंडळ कार्यालयाचे रीतसर उद्घाटन करण्यात आले. यामुळे सरकार विरोधात जिल्ह्यात तीव्र रोष व्यक्त केला जात आहे. कार्यालय स्थलांतर होत असतांना निव्वळ दिखावा म्हणुन मागणी करतांना लोकप्रतिनिधी पुढाकार घेतात. मात्र जिल्हयात नविन मोठे प्रकल्प आणुन विकासाचा मार्ग काढतांना दिसत नाही. तर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधीसह सामाजिक संघटनाही तात्पूर्ते आंदोलन करून विरोध दर्शविला. मात्र, त्यामधून काही मार्ग निघाला नाही.

## सिंचनाचा भ्रष्टाचार निवळला, नदीजोड प्रकल्पातून जिल्हा वगळला...




आकांक्षीत जिल्हा म्हणून ओळख असलेल्या वाशिम जिल्ह्याच्या पदरी पुन्हा एकदा निराशाच आली असून वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पातून वाशिम जिल्हा वगळण्यात आला आहे. त्यामुळे सिंचनाचा अनुशेष भरून निघण्याची शेतकऱ्यांची आशा मावळली आहे. नदी जोड प्रकल्पात जिल्ह्याचा समावेश झाल्याचे पोस्टर लावून चमकोगिरी करणारे नेते मात्र आता तोंडघशी पडले असून जिल्ह्यातील राजकारण्यांची निष्क्रियता पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे. विदर्भातील वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प हा राज्यस्तरीय नदीजोड प्रकल्प प्रस्तावित असून या प्रकल्पाव्दारे वैनगंगा नदीवरील भंडारा जिल्हयातील गोसीखुर्द



प्रकल्पात पावसाळ्यात उपलब्ध होणारे पाणी वैनगंगा उपखोऱ्यातून पुर्णा-तापी खोऱ्यातील बुलढाणा जिल्हयातील नळगंगा प्रकल्पापर्यंत नदीजोड कालव्याद्वारे वळविणे प्रस्तावित आहे. या कालव्याव्दारे विदर्भातील नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा ह्या सहा जिल्ह्यातील १५ तालुक्यातल्या एकूण ३७१२७७ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे. सदर प्रकल्पाची जलसंपदा विभागाच्या सन २०२२-२३ च्या दरसूचीनुसार प्रकल्पाची किंमत रु.८८,५७५ कोटी इतकी आहे. पूर्वी या प्रकल्पात वाशिम जिल्ह्याचाही समावेश होता मात्र, ६ फेब्रुवारी रोजी राज्य सरकारने काढलेल्या शासन निर्णयात वाशिम जिल्ह्याचा उल्लेख नाही. त्यामुळे आकांक्षीत जिल्ह्याचा डाग पुसण्याच्या बाता करणाऱ्या लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

तरीही, २७ ऑक्टोंबर २०२३ रोजी मंडळ कार्यालयाचे शेगाव येथे गेले.




## अमरावती विद्यापिठ उपकेंद्राचे भिजत घोंगडे कायम...

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा कलम ५ (८)अंतर्गत प्रत्येक विद्यापीठाने आपल्या शैक्षणिक नियोजनासाठी उपकेंद्र उभारणे बंधनकार आहे. मात्र, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या स्थापनेला ३९ वर्षे होऊनसुद्धा विद्यापीठ प्रशासनाने आपले उपकेंद्र सुरू केले नाही. दरम्यान, वाशीम येथे उपकेंद्र व्हावे, असा धोरणात्मक निर्णय विद्यापीठाच्या सिनेट सभेमध्ये झाला होता. त्याला उच्च व तंत्र शिक्षण विभागानेसुद्धा तत्वतः मान्यतही दिली होती.लोकप्रतिनिधींनी या संबंधि पुढाकारही घेतला होता. मात्र घोडे कुठे आडले तरी सुध्दा उपकेंद्राचा प्रश्न अद्यापही कायमच आहे.लोकप्रतिनिधी व सामाजिक संघटनांनी उपकेंद्रासाठी उभी केलेली चळवळ थंडबस्त्यात पडली आहे.




## वाशीम येथे विद्यापिठ उपकेंद्राला तत्वता मान्यता मिळाली होती...

वाशीम येथे उपकेंद्र व्हावे, याला उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून १ सप्टेंबर २०१० रोजी झालेल्या बैठकीत तत्वतः मान्यता देण्यात आली होती. शिवाय उपकेंद्रासाठी १७ कर्मचाऱ्यांची आवश्यकता असून, ६० कोटींचा खर्च अपेक्षित आहे हे सुद्धा यात ठरले. हा प्रस्ताव वित्त व संबंधित विभागाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आला. १५ वर्षांपासून तो रेंगाळला आहे. दरम्यान, बांधकामाच्या साहित्याचे भाव आणि कर्मचाऱ्यांचे पगारही वाढले. त्यामुळे आता हा खर्च ३०० कोटींपेक्षाही अधिक होणार आहे. त्यामुळे हा प्रस्ताव रखडला आहे. तर दुसरीकडे विद्यापिठ उपकेंद्र अकोल्याला होणार असल्याने पुन्हा एकदा वाशीम जिल्ह्यावर अन्याय झाला आहे. तरी सुध्दा उपकेंद्रासाठी लढणाऱ्या लोकप्रतिनिधी व सामाजिक संघटना निद्रावस्थेत असून त्यांना जिल्ह्याच्या विकासाचे काहीच घेणे देणे नसल्याचे पुन्हा एकदा सिध्द होत आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
रविवार, दि. २६ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# नांदुरा तहसील कार्यालयातील 'त्या' हल्ल्याचा तहसीलदार संघटनेकडून निषेध !

♦ जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन : कडक कारवाईची मागणी

प्रतिनिधी २६ एप्रिल

**खामगाव :** नांदुरा तहसील कार्यालयात तहसीलदार व नायब तहसीलदार यांच्यावर झालेल्या जीवघेण्या हल्ल्याच्या निषेधार्थ महाराष्ट्र राज्य तहसीलदार व नायब तहसीलदार संघटनेच्या बुलढाणा जिल्हा शाखेने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. आरोपींवर कठोर कारवाई करावी, तसेच महसूल अधिकाऱ्यांना सुरक्षा द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

निवेदना नुसार, २३ एप्रिल २०२६ रोजी तहसीलदार अजितराव जंगम यांनी रेतीची अवैध वाहतूक करणाऱ्या समाधान भगवान मोरे याच्यावर कारवाई केली होती. त्याचाच राग मनात धरून दुपारी १२ वाजता मोरे व त्याचा साथीदार तहसीलदारांच्या दालनात घुसले. आरोपीने जंगम यांच्या डोक्यावर लोखंडी वस्तू ने हल्ला केला. हस्तक्षेप करणारे नायब तहसीलदार श्रीशैल व्हट्टे यांनाही मारहाण करून जिवे मारण्याची धमकी देण्यात आली. याप्रकरणी नांदुरा पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महसूल अधिकाऱ्यांवर वाढत्या हल्ल्यांमुळे क्षेत्रीय काम धोकादायक बनल्याचे संघटनेने नमूद केले.अपर मुख्य सचिव विकास खारगे यांना बुलढाणा शाखेच्या वतीने सादर करण्यात आलेल्या निवेदना नंतर त्यांनी तत्काळ पोलिस अधीक्षक यांच्याशी दूरध्वनीवर संपर्क साधून संबंधित आरोपीला त्वरित अटक करण्याचे आदेश दिले. या निर्देशानुसार पोलिस अधीक्षकांनी नांदुरा पोलिस ठाणे तसेच गुन्हे शाखेला तत्काळ कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार आरोपीला अटक करण्यात आली असून, महसूल प्रशासनाविरुद्ध केलेल्या गंभीर कृत्याची दखल घेऊन पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. आरोपीला न्यायालयात हजर केले असता २७ एप्रिल पर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. तसेच, आरोपीविरुद्ध एमपीडीए कायद्यांतर्गत कारवाईसाठी प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.निवेदनावर संजय बंगाळे, वृषाली केसकर, विजय पाटील, सुरेश कव्हळे, समाधान गायकवाड, सदाशिव शेलार, शरद पाटील, सुनील पाटील, सुरेश थोरात, डॉ. जयश्री ठाकरे, राजेंद्र पोळ, प्रज्ञा काकडे, पवन प्रकाश पाटील, नीलेश मडके, भूषण पाटील, अजित दिवटे, वैशाली डोंगरजाळ, विठ्ठल कुमरे, विजय सवडे, रवींद्र जोगी, संतोष शिंदे, प्रा. संजय खडसे, मोहन टिकले, संजीवनी मुपडे, सरिता पाटील, समाधान सोनवणे, प्रशांत पाटील, विजय हिवाळे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# सुटाळा बु. येथे तीव्र पाणीटंचाई ; 25 दिवसांआड पाणीपुरवठा !

♦ पारखेड तलावाच्या साठ्यात घटः पर्यायी उपाययोजनांना विलंब, नागरिक टँकर वर अवलंबून

प्रतिनिधी २६ एप्रिल

**खामगाव :** शहरालगतच्या सुटाळा बु, येथे मार्च महिन्याच्या सुरुवातीपासून तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे. सध्या २० ते २५ दिवसांआड पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या पारखेड येथील तलावाची पाणीपातळी लक्षणीयरीत्या खालावल्यामुळे ही परिस्थिती उद्भवली आहे. दरम्यान, पाणीटंचाई निवारणासाठी ग्रामपंचायत प्रशासनाकडून पर्यायी उपाय योजनां मध्ये होत असलेल्या विलंबामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. सुटाळा बु, हे जिल्ह्यातील मोठ्या ग्रामपंचायतींपैकी एक महत्त्वाचे गाव असून, येथील पाणीपुरवठा पूर्णतः पारखेड तलावावर अवलंबून आहे. यंदा अपुऱ्या पावसामुळे तलाव पूर्ण क्षमतेने भरला नाही. परिणामी, उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच पाणीपातळी झपाट्याने घसरली. पर्यायी उपाय म्हणून तलावालगत खोदण्यात आलेल्या विहिरीनेही तळ गाठल्याने परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे. पूर्वी सात ते आठ दिवसांआड होणारा पाणीपुरवठा आता २० ते २५ दिवसांवर गेला आहे.

### नागरिकांना आर्थिक भुर्दंड

◆ नागरिकांना दैनंदिन वापरासाठी आवश्यक पाण्याची तीव्र टंचाई भासत आहे. या पार्श्वभूमीवर अनेकांना टँकरद्वारे पाणी विकत घ्यावे लागत असून, त्यासाठी अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागत आहे. याकडे संबंधितांचे दुर्लक्ष होत आहे.

### ग्रामपंचायतीकडून तातडीने उपाययोजनांची गरज !

◆ पाणीटंचाई निवारणासाठी पर्यायी जलस्रोत शोधणे, टँकरद्वारे नियमित व पुरेसा पाणीपुरवठा करणे, तसेच जलसंधारण उपाययोजना राबविणे अत्यावश्यक झाले आहे. ग्रामपंचायत प्रशासनाने या दिशेने तातडीने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

### गावातील बोअर व विहिरी कोरड्या !

◆ सुटाळा बु. येथील बहुतांश बोअरवेल व विहिरींनी तळ गाठल्याने पाणीटंचाईचे संकट अधिक गडद झाले आहे. स्थानिक जलस्रोत आटल्याने नागरिकांना पाण्यासाठी पर्यायी साधनांचा शोध घ्यावा लागत आहे. यामुळे महिला व नागरिकांवर पाणी आणण्याचा अतिरिक्त ताण निर्माण झाला आहे

# खामगावात रात्री घडला खुनी थरार

प्रतिनिधी २६ एप्रिल

**डीजे वर नाचताना धक्का लागल्याच्या कारणावरून खामगावात युवकाचा खून बर्डे प्लॉट मधील घटना**

**खामगाव :** खामगाव शहरातील बर्डे प्लॉट येथे २५ एप्रिल रोजी रात्री डीजे वर नाचताना लागलेल्या धक्क्या वरून उफाळलेल्या वादाचे पर्यावसन थेट खूनी थराररत झाले. यामध्ये चार ते पाच जणांनी एका २३ वर्षीय युवकाचा धारदार शस्त्र आणि फायटरने हल्ला करून जागीच ठार गेल्याचे समोर आले आहे. या घटनेमुळे बर्डे प्लॉट भागामध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले असून एकच खळबळ उडाली आहे. शोएब खान अमीन खान (२३) रा. बर्डे प्लॅाट असे मृतक युवकाचे नाव आहे. बडे प्लॅाट भागातील स्मशानभूमीच्या जवळ एका लग्न समारंभामध्ये डीजे सुरू असताना युवक नाचत होते. यामध्ये शोएब खान अमीन खान हा सुद्धा नाचत असताना त्याचा एका युवकाला धक्का लागला या क्षुल्लक कारणावरून अचानक वाद उफाळून आल्याने परिसरातील चार ते पाच जणांनी शोएब खान अमीन खान यांच्यासोबत वाद घातला आणि चार ते पाच जणांनी संगणमत करून शिवाय खान याचे वर धारदार शस्त्र आणि लाट्याकाट्याने हल्ला करून त्याला ठार मारले. घटनास्थळी पोलिसांनी बंदोबस्त लावला असून पोलिस पुढील तपास करीत आहेत

# पटसंख्या वाढविण्यासाठी शिक्षकांची धडपड ; पण शाळांत सुविधांचा अभाव !

♦ शिक्षक शाळाबाह्य कामांच्या ओझ्याखाली; अध्यापनाला मर्यादित वेळ, पालकांमध्ये नाराजी!

प्रतिनिधी २६ एप्रिल

**खामगाव :** जिल्ह्यातील ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांची पटसंख्या वाढविण्यासाठी शिक्षण विभागाने 'गुढीपाडवा अन् पट वाढवा' ही मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील शिक्षक वाडी तांड्यांवर जाऊन शाळा प्रवेशासाठी जनजागृती करत आहेत; मात्र एकीकडे शासन पटसंख्या वाढविण्यासाठी प्रयत्नशील असताना, दुसरीकडे '४० विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक' या निकषामुळे पालकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. जिल्ह्यात शेकडो जिल्हा परिषद शाळा आहेत. येथील शिक्षक मार्च महिन्यापासून घरोघरी जाऊन पालकांशी संवाद साधत पटसंख्या वाढविण्याचा प्रयत्न करत आहेत. येत्या जूनमध्ये पहिल्या वर्गातील पटसंख्या किती वाढते, यावर या मोहिमेचे यश अवलंबून आहे.जिल्हा परिषद शाळांत भौतिक सुविधांचा अभाव आणि शिक्षकांच्या कमतरतेमुळे ग्रामीण भागातील पालकांचा कल आता खासगी आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडे वाढला आहे. त्यामुळे शासनाने केवळ पट वाढविण्यावर भर न देता सुविधा वाढविण्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. ४० विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक हे शासनाचे धोरण ग्रामीण भागातील शाळांसाठी अडचणीचे ठरत आहे. इयत्ता पहिली ते चौथी किंवा सातवीपर्यंतच्या शाळा केवळ दोन ते चार शिक्षकांवर चालविल्या जात असल्याने विषयानुसार शिक्षक मिळत नाहीत. एकाच शिक्षकाला सर्व विषयांचे अध्यापन करावे लागते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होत आहे.जिल्ह्यातील अनेक शाळांच्या वर्गखोल्या जीर्ण झाल्या आहेत. तसेच काही शाळांमध्ये अद्याप विद्युतपुरवठा आणि पिण्याच्या पाण्याची सोय नाही. यामुळे संबंधित विभागाने याकडे लक्ष देण्याची गरज आहे.४०:१ चा जाचक नियम शिथिल करून वर्गागणिक आणि विषयानुसार स्वतंत्र शिक्षक नियुक्त करावेत. रिक्त सर्व पदे तातडीने भरावीत. पडझड झालेल्या शाळांच्या खोल्यांची दुरुस्ती करून वीज आणि पाण्याची सोय करावी. शिक्षकांवरील शाळाबाह्य कामांचा बोजा कमी करावा, अशा मागण्या करण्यात येत आहेत.

# कोरोना काळात बंद झालेली भुसावळ–नागपूर पॅसेंजर सुरू करा !

♦ मुंबईतील झेड आरयूसीसीच्या बैठकीत मागणी

प्रतिनिधी २६ एप्रिल

**मलकापुर :** कोरोना काळात बंद करण्यात आलेली भुसावळ-नागपूर पॅसेंजर रेल्वे पुन्हा सुरू करावी, तसेच अमरावती-मुंबई व नागपूर-मुंबई समर स्पेशल गाड्या सुरू करण्याची मागणी झेड आरयूसीसी सदस्य ॲड. महेंद्रकुमार बुरड यांनी केली. २३ एप्रिल रोजी मुंबई येथे झालेल्या झेड आरयूसीसीच्या बैठकीत त्यांनी मागण्या मांडल्या. या बैठकीस रेल्वेचे महाव्यवस्थापक राजीव श्रीवास्तव, खासदार अनुप धोत्रे, धनंजय महाडिक यांच्यासह झेड आरयूसीसीचे सदस्य व विविध विभागांचे रेल्वे अधिकारी उपस्थित होते. ॲड. बुरड यांनी सांगितले की, कोरोना काळात बंद करण्यात आलेली भुसावळ-नागपूर पॅसेंजर अद्याप सुरू झालेली नाही. त्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत असून, ही सेवा तातडीने सुरू करणे आवश्यक आहे, तसेच अमरावती-मुंबई आणि नागपूर-मुंबई समर स्पेशल गाड्याही सुरू करण्यात याव्यात, अशी मागणी त्यांनी केली.नागपूर-मुंबई समर स्पेशल गाडी आठवड्यातून तीन दिवस चालविण्या बाबत बैठकीत सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याची माहिती दिली.याशिवाय, विदर्भाचे प्रवेशद्वार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मलकापूर रेल्वेस्थानकाच्या 'अमृत भारत' योजनेअंतर्गत सुरू असलेल्या विकासकामांना गती देऊन ती लवकर पूर्ण करण्याची मागणीही करण्यात आली. यावर उपस्थित खासदार व रेल्वे अधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत संबंधित विभागांना तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

# कौटुंबिक वादातून मारहाण व शिवीगाळ ; चौघांविरुध्द गुन्हा

प्रतिनिधी २६ एप्रिल

**शेगांव :** शहरातील वाटीका चौक परिसरात कौटुंबिक वादातून मारहाण झाल्याची घटना १५ एप्रिल रोजी वाटीका चौकात घडली. याप्रकरणी परस्पर विरोधी तक्रारींवरून चौघांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, प्रकाश लक्ष्मण तायडे (वय ६५, रा. गौलखेड रोड, शेगाव) यांनी शहर पोस्टेला दिलेल्या तक्रारीवरून आरोपी सोहेल अली एजाज अली (वय ३५, रा. खामगाव) याच्याविरुद्ध अप नं. २६१/२०२६ अंतर्गत भारतीय न्याय संहिता कलम २९६, ३५१(२) तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत कलम ३(१) (आरसी), ३(२) (व्ही.ए.) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी हे आपल्या मित्राच्या कौटुंबिक वादात मध्यस्थी करण्यासाठी तेथे गेले होते. त्यावेळी आरोपीने संतापून फिर्यादीस धमकावत जातीवाचक व गलिच्छ शिवीगाळ करून अपमानित केल्याची तक्रार करण्यात आली आहे. या प्रकारामुळे फिर्यादीस मानसिक धक्का बसल्याचे नमूद करण्यात आले आहे. तरदुसऱ्या बाजुने फिर्यादी फातिमा बी एजाज अली (वय ५४, रा. शौकत कॉलनी, खामगाव) यांनी दिलेल्या तक्रारीवरून आरोपी शेख अकबर शेख इमाम (रा. आळसना), प्रकाश लक्ष्मण तायडे (रा. आळसना) व अल्मास क्लिनिकचे डॉक्टर अन्सार (रा. आझाद नगर, शेगाव) यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. १५ एप्रिल रोजी दुपारी दीड वाजताच्या सुमारास अपना फर्निचर, वाटिका चौक येथे कौटुंबिक कारणावरून वाद झाला. या वादातून आरोपींनी फिर्यादीं सोबत भांडण करून शिवीगाळ केली व जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे. तसेच आरोपी प्रकाश तायडे यांनी फिर्यादीं च्या मुलाकडून ५० हजार रुपयांची मागणी करत, पैसे न दिल्यास खोटा ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्याची व नोकरी घालविण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी शेगाव शहर पोलीस स्टेशनमध्ये अप क्रमांक २६५/२०२६ अन्वये कलम ३०८(२), ३५२, ३५१ (२), ३(५) भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# टुनकी बु. सरपंचाची खोटी सही व शिक्क्याने बनावट वारस प्रमाणपत्र; एकाविरुध्द गुन्हा

प्रतिनिधी २६ एप्रिल

**खामगाव :** टूनकी बु येथील सरपंचाची खोटी सही व शिक्याने दोन भाऊ वारस असतांना वारसाचे बनावट प्रमाणपत्र आधारे प्रतिज्ञा लेख तयार केला. त्या आधारे एकच वारस दाखवून शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी पोस्टे सोनाळा येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उपरोक्त प्रकार २७ मार्च २०२३ पूर्वी घडला असून याप्रकरणी २३ एप्रिल २०२६ ला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संग्रामपूर तालुक्यातील टूनकी बु. येथील स्व. विठ्ठल जगदेव चोरे यांच्या मालकीची मौजे टूनकी येथे नझूल सीट नं. ४ प्लॉट नं. ३२७ मध्ये १९.८३ चौ. मी. क्षेत्रफळ असलेल्या जागेवर वारसाची नोंद घेण्यासाठी प्रमाणपत्राच्या आधारे प्रतिज्ञा लेख देऊन एकच वारस दाखविला. यासाठी शालीग्राम विठठल चोरे या आरोपीने बनावट संग्रामपूर येथील उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालयाकडे प्लॉट नं. ३२७ वर वारसांची नोंद घेण्यासाठी टुनकी बु. येथील सरपंचाची खोटी सही व शिक्याने बनावट वारस प्रमाणपत्राच्या आधारे भुमि अभिलेख कार्यालयात बनावट सही करून अथवा कोणाची तरी सही घेवून या प्रमाणपत्रावर एकटाच मुलगा वारस असल्याचे दाखवून तसे प्रतिज्ञापत्र देऊन शासनाची फसवणूक केली आहे. प्रत्यक्षात मृतकाला दोन मुले वारस असताना आरोपीने स्वतःला एकमेव वारस दाखवून फसवणूक केली आहे. याप्रकरणी प्रल्हाद तुळशीराम चोरे यांच्या लेखी तक्रार अर्जाचा चौकशी अहवाल तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक बुलढाणा यांच्या परवानगीवरून शालिग्राम चोरे या आरोपीविरुद्ध कलम ४२०, ४६८, ४७१ भारतीय दंड संहिता सन १८६० नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# वीजपुरवठा खंडित झाल्यास कर्मचाऱ्यांना थेट फोन टाळावा !

प्रतिनिधी २६ एप्रिल

**खामगाव:** खामगाव रात्रीची वेळ असो वा भरदुपार, अचानक वीजपुरवठा खंडित झाला की, नागरिक तत्काळ ओळखीच्या वीज कर्मचाऱ्याला किंवा वायरमनला वैयक्तिक क्रमांकावर फोन करतात; मात्र अशाप्रकारे केलेला फोन दुरुस्तीचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण करू शकतो. ही बाब लक्षात घेऊन महावितरणने ग्राहकांना थेट फोन न करण्याचे आवाहन केले असून, तक्रार नोंदणीसाठी उपलब्ध अधिकृत पर्यायांचा वापर करण्याचे सूचित केले आहे. दुरुस्तीचे काम सुरू असताना कर्मचाऱ्यांचे पूर्ण लक्ष तांत्रिक कामांकडे असणे अत्यावश्यक असते. अशावेळी येणाऱ्या फोनमुळे त्यांचे लक्ष विचलित होऊन अपघाताचा धोका वाढू शकतो. अनेकदा कर्मचारी कामात व्यस्त असल्याने फोन उचलू शकत नाहीत, यामुळे ग्राहकांमध्ये गैरसमज आणि नाराजी निर्माण होते.कर्मचाऱ्यांची सुरक्षितता आणि कामातील एकाग्रता कायम राखण्यासाठी कॉल सेंटर, मोबाइल ॲप किंवा इतर अधिकृत माध्यमांचा वापर करणे अधिक हितावह ठरते. वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर किमान १० ते १५ मिनिटे प्रतीक्षा करून नंतरच तक्रार नोंदवावी, असेही महावितरणने स्पष्ट केले आहे.

### 'व्हॉट्सॲप'वरही सेवा ग्राहकांसाठी उपलब्ध !

◆ महावितरणने ग्राहकांच्या सोयीसाठी 'व्हॉट्सॲप'वर तक्रार नोंदवण्याची सुविधा सुरू केली आहे. २१६७७७७२१ या क्रमांकावर 'हाय' असा संदेश पाठवून भाषा निवडल्यानंतर वीजबिल पाहणे, भरणे किंवा तक्रार नोंदवणे यासारख्या सेवा मिळतात. अधिकृत खात्याची खात्री करण्यासाठी 'ब्ल्यू टिक' तपासण्याचे आवाहन केले

## संमिश्र

# अखेर जिल्ह्यातील 123 शाळांच्या वेतनाचा प्रश्न सुटला

♦ भारतीय जनता पक्षाच्या पाठपुराव्याला यश

प्रतिनिधी २६ एप्रिल

**अकोला :** समायोजन, डिजिटलायझेशन व पोस्ट शिफ्टिंग आदी कारणांमुळे अकोला जिल्ह्यातील ४९ खाजगी प्राथमिक व ७४ माध्यमिक शाळांचे माहे मार्च व एप्रिल २०२६ वेतन प्रशासनाने थांबविले होते.

याबाबत अकोला पूर्वचे आमदार मा.श्री. रणधीरजी सावरकर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मनीष गावंडे यांनी समायोजन, डिजिटलायझेशन व पोस्ट शिफ्टिंग या तीनही समस्यांचे कारण प्रशासनाची उदासीनता असल्याचा आरोप करत. या तिन्ही समस्या करिता शिक्षण विभाग जबाबदार असून, शिक्षण विभागाने वेळीच कार्यवाही न? केल्याने शिक्षकांना नाहक मनस्ताप होत असल्यामुळे शिक्षकांच्या हक्काच्या वेतनासाठी दिनांक २८ एप्रिल २०२६ पूर्वी जिल्ह्यातील १२३ शाळांचे वेतन देयक न स्वीकारल्यास दिनांक २८ एप्रिल २०२६ रोजी शिक्षणाधिकारी कार्यालयात बेमुदत ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा भारतीय जनता पक्षाच्या ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मनिष गावंडे यांनी निवेदनाद्वारे प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्यासह राज्याचे शिक्षण राज्यमंत्री, शिक्षण आयुक्त, शिक्षण संचालक व अमरावती विभागाचे शिक्षण उपसंचालक यांना दिला होता. अखेर राज्याचे शालेय शिक्षण राज्यमंत्री मा.ना.श्री. पंकजची भोयर यांनी हस्तक्षेप करून वरिष्ठ अधिकाऱ्यांना तात्काळ कारवाई करण्याबाबत सूचना दिल्या. यानंतर तात्काळ प्रशासनाने पत्र काढून माहे मार्च २०२६ व एप्रिल २०२६ चे वेतन अदा करण्याकरिता बंद करण्यात आलेली टॅब पुन्हा सुरू केली आहे. ज्यामुळे अकोला जिल्ह्यातील १२३ शाळातील शिक्षकांच्या वेतनाचा प्रश्न सुटला आहे.

# स्कूल संसद' उपक्रमांतर्गत जैन साध्वी प्रभा प्रकाश कॉन्व्हेंटच्या प्रग्यान धारतरकरची निवड



**आलेगाव :** पुणे येथील नामांकित शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या संस्थेच्या वतीने आयोजित 'स्कुल संसद' (एव्ददतसंसद) या अत्यंत महत्त्वाकांक्षी आणि नाविन्यपूर्ण शालेय उपक्रमांतर्गत, जैन साध्वी प्रभा प्रकाश कॉन्व्हेंट, आलेगाव येथील इयत्ता ९ वीचा विद्यार्थी प्रग्यान धारतरकर याची राज्यस्तरावर निवड झाली आहे. प्रग्यानला या उपक्रमांतर्गत 'स्टुडंट एमपी' आणि पक्ष प्रमुख ही सन्माननीय पदवी मिळाली असून, त्याला नुकतीच मुंबई येथील विधान भवनाला भेट देण्याची सुवर्णसंधी प्राप्त झाली. या यशाबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

◆ प्रग्यानने आपल्या या यशाचे श्रेय पंचायत समिती पातूरचे गटशिक्षणाधिकारी प्रवीण डाबेराव, केंद्रप्रमुख निवास चव्हाण, शाळेचे अध्यक्ष अक्षय जैन, तसेच मुख्याध्यापक. महावीर जैन यांना दिले आहे. विशेषतः या संपूर्ण उपक्रमात मोलाचे मार्गदर्शन करणाऱ्या शाळेच्या शिक्षिका कु. प्रगती महल्ले आणि वर्ग शिक्षक श्री. निलेश पस्तापुरे यांचे विशेष सहकार्य त्याला लाभले.

# महानगरात राज्यस्तरीय अशोक पर्व महोत्सव 29 एप्रिल रोजी

प्रतिनिधी २६ एप्रिल



**अकोला :** जनकल्याणकारी शासनव्यवस्था, समता आणि मानवतेचा संदेश देणारे महान सम्राट अशोक यांच्या कार्याची आठवण ठेवण्यासाठी महानगरात दरवर्षीप्रमाणे यंदाही राज्यस्तरीय 'अशोक पर्व महोत्सव' उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. यंदाचा महोत्सव २९ एप्रिल रोजी विविध कार्यक्रमांनी रंगणार असून बहुजन समाजासह अनेक सामाजिक संघटनांचा सहभाग राहणार आहे. अशोक पर्व महोत्सवाचे अध्यक्ष डॉ. संतोष हुरे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यावेळी सम्राट अशोक प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. विजय आटवले, प्रा. डॉ. बालकृष्ण खंडारे, प्रा. सुनील कांबळे, प्रा. शैलेश इंगळे, अनिल गवई, विद्याराज मोहोड आदी उपस्थित होते. महोत्सवाची सुरुवात सकाळी बौद्ध वंदना व दीपप्रज्वलनाने होणार आहे. त्यानंतर भगवान बुद्ध तसेच महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात येईल. पुढील सत्रात विविध मान्यवरांचे मार्गदर्शन लाभणार असून सामाजिक, शैक्षणिक व प्रशासकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना 'सम्राट अशोक रत्न', 'अशोक गौरव' आणि 'संघर्ष नायक' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच शासन कार्यालये, शाळा व महाविद्यालयांमध्ये सम्राट अशोक यांच्या प्रतिमा व अशोक स्तंभ उभारण्याबाबत जनजागृती अभियान राबविण्यात येणार आहे. बहुजन समाजातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महोत्सव यशस्वी करावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

रविवार, दि. २६ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# केरोसीन येण्याआधीच राशन दुकानदारांमध्ये नाराजी

प्रतिनिधी २६ एप्रिल

**अकोला :** गॅस टंचाईने आधीच हवालदील झालेल्या नागरिकांना दिलासा म्हणून शासनाने केरोसीन वाटपाचा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. राज्यात गॅस सिलेंडर टंचाईच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात ७२ केएल केरोसीन येत्या एक-दोन दिवसात उपलब्ध होण्याची शक्यता आहे प्रति लिटर ६५ रुपये असा दर पुरवठा विभागात द्वारा निश्चित करण्यात आलेला आहे. अकोट अकोला बाळापूर मुर्तीजापुर पातुर तेल्हारा आणि बार्शीटाकळी तालुक्यात प्रत्येकी सहा हजार लिटर केरोसीन अंत्योदय व प्राधान्य गटातील रेशन कार्डधारकांना मिळण्याची शक्यता आहे दुर्गम गावातील कुटुंबांना प्रत्येकी तीन लिटर केरोसीन देण्यात येईल याबाबतचे प्राधान्य तहसीलदार ठरविणार आहेत.

## ♦ एक ते दोन दिवसात जिल्ह्याला मिळणार केरोसीन



### गॅस सिलेंडर साठी ऑनलाईन बुकिंग लवकर होत नसल्याने नागरिक परेशान

जिल्ह्यात २०१८ पूर्वी स्वस्त धान्य दुकानदारांमार्फत केरोसीन वितरण होत होते त्यानंतर ग्रामीण भागातही गॅसचा वापर वाढल्याने केरोसीन वितरण बंद झाले मात्र सध्या गॅस सिलेंडरच्या टंचाईमुळे शहरी भागात सुमारे २५ तर ग्रामीण भागात ४५ दिवस ऑनलाइन बुकिंग होत नसल्याने परिस्थिती गंभीर बनली आहे पर्याय म्हणून पहिला टप्प्यात अंत्योदय व प्राधान्य घटकातील कुटुंबांना केरोसीन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### केरोसीन येण्याआधीच राशन दुकानदारांमध्ये नाराजी

गॅस टंचाईच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत केरोसीन वितरणाचा निर्णय शासनाने घेतला आहे मात्र जिल्ह्यासाठी केवळ ७२ केएलचा कोटा मंजूर झाल्याने तो अपुरा ठरणार आहे ग्राहकांना केरोसीन ६५ रुपये प्रति लिटर दराने मिळणार असून स्वस्त धान्य दुकानदारांना लिटर मागे अडीच रुपये कमिशन देण्यात येणार आहे त्यामुळे दुकानदारांमध्ये काहीशी नाराजी व्यक्त होत आहे. त्यामुळे प्रशासनाला राशन दुकानदारांची समजूत काढणे भाग पडणार आहे. विशेष बाब म्हणजे केरोसीन वितरण करण्याकरता कोणताही वितरक तयार होत नसल्याची बाब सुद्धा समोर आली आहे कारण ६५ रुपये लिटर प्रमाणे केरोसीन ना ग्राहकांना परवडणार आहे ना ग्रामीण भागात केरोसीन पोहोचवणाऱ्या वितरकाला परवडणार आहे अशी माहिती मिळत आहे. त्यामुळे केरोसीन येण्याआधीच नागरिकांपर्यंत केरोसीन कसे पोहोचवावे हा पेच प्रशासनाला पडला आहे

# लवकरच लग्नाच्या पत्रिकांवर वधू आणि वराची जन्मतारीख छापणे अनिवार्य!

## ♦ राज्य बाल हक्क आयोगाने राज्य सरकारला पाठवला प्रस्ताव

प्रतिनिधी २६ एप्रिल

**अकोला :** राज्यात बालविवाह रोखण्यासाठी राजस्थानच्या पावलावर पाऊल ठेवत, राज्य बाल हक्क आयोगाने लग्नाच्या निमंत्रण पत्रिकांवर वधू आणि वराची जन्मतारीख समाविष्ट करणे अनिवार्य करण्याबाबत राज्य सरकारला एक प्रस्ताव पाठवला आहे. ही माहिती राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने दिली आहे.

सोलापूर जिल्ह्यातील अल्पवयीन मातांशी संबंधित प्रकरणांच्या सुनावणीदरम्यान हा निर्णय घेण्यात आला. सुनावणीत असे समोर आले की, अनेक प्रकरणांमध्ये बालविवाह, लैंगिक शोषण आणि सामाजिक-आर्थिक घटक एकमेकांशी जोडलेले आहेत. आयोगाने म्हटले आहे की, अल्पवयीन मुलींचा बालविवाह हे मुलांच्या हक्कांचे गंभीर उल्लंघन आहे. आयोगाने जिल्हा प्रशासनाला निर्देश दिले आहेत की राजस्थानमध्ये कायदा लागू आहे. राजस्थानमध्ये बालविवाह



रोखण्यासाठी, राजस्थान सरकारने यावर्षी निमंत्रण पत्रिकांवर वधू आणि वराची जन्मतारीख छापणे अनिवार्य करून कठोर उपाययोजना केल्या आहेत. कार्ड छापण्यापूर्वी वयाचा पुरावा (जसे की आधार कार्ड किंवा जन्म प्रमाणपत्र) पडताळून पाहण्याचे निर्देश छापखान्यांना देण्यात आले आहेत.

महिला व बाल विकास, आरोग्य, पोलीस आणि शिक्षण विभागांचा समावेश असलेले एक संयुक्त विशेष पथक स्थापन करण्यात आले आहे. हे पथक एक ते दीड महिन्याच्या आत एक कृती आराखडा तयार करेल. सर्व अल्पवयीन मातांना वैद्यकीय, पोषण आणि समुपदेशन सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. आयोगाने पॉक्सो कायदा, २०१२ आणि बालविवाह प्रतिबंधक कायद्यांतर्गत कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. राज्य बाल हक्क आयोगाने म्हटले की, राज्यात बालविवाहाच्या घटनांमध्ये झपाट्याने होणारी वाढ गंभीर प्रश्न निर्माण करत आहे. राज्यात एकट्या सोलापूर जिल्ह्यातच बालविवाहाची ८७ प्रकरणे उघडकीस आल्याने परिस्थितीचे गांभीर्य अधिकच अधोरेखित झाले आहे.

# बसंती हॉस्पिटलचा 38 वा वर्धापन दिन उत्साहात साजरा; सेवाभावी आरोग्य कार्याचा गौरव



प्रतिनिधी २६ एप्रिल

**अकोला :** शहरातील बसंती हॉस्पिटलचा ३८ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात स्व. बसंतीबाई लक्ष्मीनारायण चांडक यांच्या अर्धाकृती पुतळ्याला ट्रस्टींच्या हस्ते माल्यार्पण करून करण्यात आली. या प्रसंगी हॉस्पिटलमधील डायलिसिस सेंटरची माहिती देताना सांगण्यात आले की, येथे सध्या २६ मशीन सतत कार्यरत असून, मुंबईनंतर महाराष्ट्रातील एक मोठे सिंगल डायलिसिस सेंटर म्हणून या केंद्राची ओळख आहे. विशेष म्हणजे या केंद्रात रुग्णांना मोफत औषधे दिली जातात तसेच बाहेरील रुग्णांच्या ये-जा खर्चाचीही जबाबदारी डायलिसिस विभागाकडून उचलली जाते.

कार्यक्रमादरम्यान ट्रस्टमार्फत दीर्घकाळ सेवा देणाऱ्या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. अकोला नेत्र अस्पतालमध्ये २३ वर्षे सेवा बजावणारे डॉ. श्रीकांत मालपाणी यांचा रमाकांत खेतान यांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन गौरव करण्यात आला. तसेच हॉस्पिटलचे व्यवस्थापक विजयकुमार मुंदडा यांचा ३७ वर्षांच्या सेवेसाठी ट्रस्टच्या वतीने सत्कार करण्यात आला. संस्थेचे ट्रस्टी अध्यक्ष श्यामबाबू चांडक यांचाही उत्कृष्ट कार्याबद्दल माहेश्वरी समाजाच्या वतीने गौरव करण्यात आला. हा सत्कार माहेश्वरी समाजाचे व्हाईस प्रेसिडेंट विजयकुमार राठी, भूतपूर्व अध्यक्ष विजयकुमार पनपालिया, विनीत बियाणी आणि रमन हेडा यांच्या हस्ते करण्यात आला.या कार्यक्रमाला पूजा खेतान, ॲड. सतीश भुतडा, श्रीकिशन अग्रवाल, विनोद खेतान, डॉ. एन. के. माहेश्वरी, विनोद झवर, श्री मंत्री, मनोज चांडक, प्रफुल्ल चांडक, प्रवीण मोहता, सीए रमेश चौधरी तसेच कमलकिशोर शर्मा आदी मान्यवर प्रमुख म्हणून उपस्थित होते. माहेश्वरी समाजातील सदस्यांचीही मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

२४ एप्रिल १९८८ रोजी स्व. बसंती चांडक यांच्या स्मरणार्थ स्थापन झालेल्या या संस्थेने गेल्या ३८ वर्षांत आरोग्यसेवेच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. आतापर्यंत हॉस्पिटलमार्फत सुमारे ६९ हजारांहून अधिक नेत्रशस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडल्या असून, मागील ११ वर्षांत विविध शासकीय योजनांच्या माध्यमातून सुमारे १ लाख ४० हजार डायलिसिस प्रक्रिया पूर्ण करण्यात आल्या आहेत. हॉस्पिटलमध्ये नेत्र, डायलिसिस, युरोलॉजी, अस्थिरोग आणि पल्मनोलॉजी अशा विविध विभागांद्वारे अत्याधुनिक वैद्यकीय सेवा उपलब्ध आहेत. मोतीबिंदूवरील फेको शस्त्रक्रिया, लेसर उपचार, किडनी स्टोनवरील उपचार, फिस्टुला ऑपरेशन तसेच फ्रॅक्चर, दमा आणि निमोनिया यांसारख्या आजारांवर प्रभावी उपचार येथे केले जातात. रुग्णांना परवडणारी आरोग्यसेवा मिळावी यासाठी महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजना व प्रधानमंत्री जनआरोग्य योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. याशिवाय ट्रस्टमार्फत दरवर्षी एक लाख रुपयांचा साहित्य पुरस्कार दिला जातो, गुणवंत विद्यार्थ्यांना गोल्ड मेडल प्रदान केले जाते तसेच श्राद्ध पक्ष आणि नवरात्र काळात एक महिना मोफत भोजन देण्याची परंपरा मागील २० वर्षांपासून अखंड सुरू आहे. हॉस्पिटलचे व्यवस्थापक विजयकुमार मुंदडा यांनी सांगितले की, आगामी काळात अधिकाधिक रुग्णांना गुणवत्तापूर्ण व परवडणारी आरोग्यसेवा देण्याचा संस्थेचा संकल्प आहे. एकूणच, बसंती हॉस्पिटलने गेल्या ३८ वर्षांत सामाजिक बांधिलकी जपत आरोग्यसेवेची परंपरा अधिक बळकट केली असून वर्धापन दिनाचा सोहळा उत्साहात संपन्न झाला.

# अग्रवाल कोचिंग क्लासेसच्या 44 विद्यार्थ्यांचे सुयश

प्रतिनिधी २६ एप्रिल

## ♦ अकोल्याच्या शैक्षणिक इतिहासात नवा अध्याय

**अकोला :** राम नगर स्थित अग्रवाल कोचिंग क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी दहावी सीबीएसई बोर्डाच्या परीक्षेत अभूतपूर्व यश संपादन करत अकोल्याच्या शैक्षणिक गुणवत्तेचा झेंडा पुन्हा एकदा फडकवला आहे. २०२५-२६ च्या या शैक्षणिक वर्षात क्लासच्या तब्बल ४४ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले आहे.



अग्रवाल कोचिंग क्लासेसच्या निकालाने यंदा निकालाचे सर्व जुने विक्रम मोडीत काढले आहेत. ९० टक्क्यांहून अधिक गुण असलेले ४४ विद्यार्थी आहे. तर ९५ टक्क्यांहून अधिक गुण असलेले ११ विद्यार्थी राम नगर स्थित अग्रवाल कोचिंग क्लासचे आहे. क्लासच्या बहुतांश विद्यार्थ्यांनी वैयक्तिक सर्वोत्तम गुणांची नोंद केली आहे. या ऐतिहासिक यशाबद्दल बोलताना क्लासेसचे संचालक संकेत अग्रवाल म्हणाले की, 'अकोला शहरात पहिल्यांदाच असा ऐतिहासिक निकाल लागला आहे, याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. आम्ही अगदी वर्षाच्या सुरुवातीपासूनच विद्यार्थ्यांकडून नियोजनबद्ध तयारी करून घेतो. विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचा विश्वास या त्रिवेणी संगमामुळेच हे 'नेत्रदीपक' यश शक्य झाले आहे. या निकालाने आमच्या शिक्षण पद्धतीवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब केले आहे.' आपल्या पाल्यांच्या या उत्तुंग यशानंतर पालकांनी आनंद व्यक्त करत अग्रवाल कोचिंग क्लासेसमध्ये पेढे वाटून जल्लोष साजरा केला. पालकांनी यावेळी क्लासच्या वैयक्तिक लक्ष देण्याच्या पद्धतीची आणि सराव परीक्षांच्या आयोजनाची भरभरून प्रशंसा केली. 'योग्य वेळी योग्य मार्गदर्शन मिळाल्यास मुले कशी भरारी घेऊ शकतात, हे या निकालावरून स्पष्ट झाले आहे,' अशा भावना पालकांनी यावेळी व्यक्त केल्या.या यशाबद्दल अकोल्यातील शैक्षणिक वर्तुळातून अग्रवाल कोचिंग क्लासेसच्या टीमवर आणि यशस्वी विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# जिल्ह्यातील 207 विद्यार्थ्यांनी मिळवली केंद्र शासनाची शिष्यवृत्ती

प्रतिनिधी २६ एप्रिल

**अकोला :** एन एम एम एस परीक्षेत जिल्ह्यातील २०७ विद्यार्थी विद्यार्थ्यांनी मिळवली शिष्यवृत्ती. प्रथम क्रमांक अनुज नंदकिशोर कुटे पातूर, व्दितीय क्रमांक तन्वी गजेंद्र गुजरअकोट, तर तृतीय क्रमांक सुमित गोपाल अवचार, तेल्हारा यांनी पटकाविलाआहे . आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील हुशार विद्यार्थ्यांची इयत्ता आठवी नंतर होणारी शाळेतील गळती रोखणे हे उद्दिष्ट ठेवून भारत सरकारने राष्ट्रीय आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेचे आयोजन केले होते यामध्ये अकोला जिल्ह्यामधून इयत्ता आठवी मध्ये शिकणारे २०७ विद्यार्थी गुतवतेनुसार शिष्यवृत्ती पात्र झालेले आहेत. जिल्ह्यातून प्रथम क्रमांक अनुज नंदकिशोर कुटे तुळसाबाई कावल विद्यालय पातुर द्वितीय क्रमांक कुमारी तन्वी गजेंद्र गुजर भाऊसाहेब पोटे विद्यालय अकोट तर तृतीय क्रमांक सुमित गोपाल अवचार जिल्हा परिषद शाळा तेल्हारा यांनी पटकाविला आहे.तालुका निहाय निवडप्राप्त विद्यार्थी खालील प्रमाणे आहेत अकोला तालुका ७३, अकोट तालुका ४३, बाळापूर तालुका ८, बार्शिटाकळी तालुका ७, मुर्तिजापूर तालुका १९, पातूर तालुका ४, तेल्हारा तालुका ५३, असे एकूण अकोला जिल्हातून २०७ विद्यार्थ्यांची निवड झालेली आहे तसेच सेट बन्सीधर विद्यालय तेल्हारा येथील २६ विद्यार्थी भाऊसाहेब पोटे विद्यालय अकोट येथील २१ विद्यार्थी तसेच महाराष्ट्र माध्यमिक शाळा अकोला याचे १४ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र झाले असुन अकोला जिल्हाला घवघवीत यश प्राप्त झाले आहे या यशाचे श्रेय शिक्षणाधिकारी डॉ. अरविंद मोहरे, प्रमोद टेकाडे, सुभाष भालेराव उपशिक्षणाधिकारी (माध्य ), विनोद मानकर जिल्हा विज्ञान पर्यवेक्षक ,जिल्हा व तालुका विज्ञान अध्यापक मंडळ अकोला यांचे आहे.

# मनपा आयुक्त डॉ.सुनील लहाने झाले जनगणना प्रशिक्षणार्थी

प्रतिनिधी २६ एप्रिल

**अकोला :** महानगरपालिका क्षेत्रातील जनगणना कामाकरिता नियुक्त करण्यात आलेले जनगणना प्रगणक व पर्यवेक्षक यांचे प्रशिक्षण महानगरपालिका क्षेत्रातील आठ प्रशिक्षण केंद्रांवर दि. २३ एप्रिल पासून सुरू करण्यात आले असून सदर प्रशिक्षणामध्ये प्रशिक्षण केंद्रनिहाय नियुक्त क्षेत्रीय प्रशिक्षक यांचेव्दारे प्रशिक्षणाची कार्य सुरू आहे.

सदर प्रशिक्षण कार्यक्रमाकरीता उपस्थित प्रशिक्षणार्थी यांच्या प्रशिक्षणा दरम्यान जनगणना कार्याबाबत देण्यात येणारी माहिती, उपलब्ध सोई-सुविधा तसेच प्रशिक्षण स्थळी जनगणना संचालनायाचे निर्देशानुसार आवश्यक सुविधा व साहित्य याबाबतची प्रत्यक्ष भेट देऊन महानगरपालिका आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी, अकोला महानगरपालिका डॉ.सुनिल लहाने यांनी पाहणी केली. यावेळी प्रत्येक प्रशिक्षण केंद्राला भेट दिल्या नंतर क्षेत्रीय प्रशिक्षक यांचेव्दारा देण्यात येणारे मार्गदर्शन व माहिती आयुक्तांनी स्वत: प्रशिक्षणार्थी होऊन उपस्थित प्रशिक्षणार्थ्यांच्या समवेत जाणून घेतली, यावेळी डिजीटल पद्धतीने जनगणनेचे होणारे संपुर्ण कामकाज अधिकाधिक सोप्या स्वरूपात प्रशिक्षणार्थ्यांना समजविण्याकरिता क्षेत्रीय प्रशिक्षकांना सुचना दिल्या.जनगणना



प्रशिक्षण देण्यात येणा-या आर.एल.टी. महाविद्यालय, स्कुल ऑफ स्कॉलर्स, हिंगणा रोड, व श्री शिवाजी विद्यालय, मुख्य शाखा, देशमुख पेठ येथे भेट देऊन प्रशिक्षणार्थ्यांचा समस्या जाणून घेतल्या तसेच प्रशिक्षणाकरिता उपलब्ध करून देण्यात ाालेल्या सोई-सुविधांबाबत सुध्दा समाधान व्यक्त करून क्षेत्रीय प्रशिक्षकांव्दारा देण्यात येणा-या प्रशिक्षणा बाबत प्रशंसा करून उपस्थित प्रशिक्षणार्थी, पर्यवेक्षक यांना जनगणना कार्याच्या महत्वाबद्दल संबोधीत सुध्दा केले. यावेळी त्यांचे समवेत जनगणना विभाग प्रमुख अनिल बिडवे तसेच संबंधीत चार्ज जनगणना अधिकारी राजेश सरप, विठ्ठल देवकते, देविदास निकाळजे यांची उपस्थिती होती.

# हमजा प्लॉट मधील अवैध धंदे त्वरित बंद करा

प्रतिनिधी २६ एप्रिल

**अकोला :** जुन्या शहरातील हमजा प्लॉट परिसरात वरली मटका, जुगार क्लब, अवैध दारू व्यवसाय व अंमली पदार्थ विक्री होत आहे. ती ताबडतोब बंद करण्यात यावी यासाठी सामाजिक कार्यकर्ते शेख बशीर शेख इब्राहिम यांनी पोलिस अधीक्षकांना निवेदन दिले. आमच्या परिसरात मोठ्या प्रमाणात वरील धंदे चालु आहेत. या धंद्यामुळे आमच्या परिसरातील लोकांना खुप त्रास होत आहे. अवैध व्यवसाय करणारे लोक जुनेशहर परिसरात गुंडागर्दी करतात व दहशत निर्माण करतात. या कृत्यामुळे युवापिढी आहारी गेली आहे. गंभीर म्हणजे विद्यार्थी व मजुरी काम करणारे मुले त्यांच्या जाळ्यात अडकलेले आहेत. वरील ठिकाणी इतर नगरातील मुले येवुन शिवीगाळ करतात व मारहाण सुध्दा करून आमच्या परिसरातील वातावरण दुषित करतात. या अनिष्ट बाबींना पायबंद घालावा तसेच या भागात शांतता प्रस्थापित करावी अशी मागणी केली.



**शेख बशीर शेख इब्राहिम यांचे एसपींना निवेदन**

# मूर्तिजापूर कृषी उत्पन्न बाजार समितीतील गैरव्यवहार प्रकरण पेटले

## आरोपींच्या अटकेसाठी साखळी उपोषणाचा इशारा

प्रतिनिधी २६ एप्रिल

**मूर्तिजापूर :** स्थानिक कृषी उत्पन्न बाजार समितीतील कथित १ कोटी ८२ लाख रुपयांच्या आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी आरोपींवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. या पार्श्वभूमीवर व्यापारी, अडते, शेतकरी व नागरिकांनी शुक्रवारी साखळी उपोषणाचा इशारा दिला. यासंदर्भात आमदार, उपविभागीय अधिकारी , पोलिस निरीक्षक, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव यांना निवेदन देण्यात आले आहे. बाजार समितीतील कोट्यवधी रुपयांच्या आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात अलका सुनील अग्रवाल, सुनील ब्रिजमोहन अग्रवाल, केवल सुनील अग्रवाल आणि सलोनी केवल अग्रवाल (पचेरीवाल ) यांच्यावर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल झाले आहेत. मात्र, काही आरोपींनाच अटक करण्यात आली असून इतर आरोपी अद्याप मोकाट असल्याने व्यापारी ,अडते व शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. याबाबत प्रशासनाकडून ठोस व जलद कारवाई होत नसल्याचा आरोप करण्यात येत आहे. 'एकाच प्रकरणात निवडक आरोपींवरच कारवाई होणे योग्य नाही. सर्व आरोपींवर समान कारवाई व्हावी,' अशी ठाम भूमिका आंदोलकांनी घेतली आहे. या प्रकरणामुळे बाजार समितीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून प्रशासनाच्या निष्पक्षतेबाबतही शंका व्यक्त केली जात आहे. त्यामुळे उर्वरित आरोपींना तात्काळ अटक करून संपूर्ण



प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, प्रशासनाने वेळेत योग्य ती कारवाई न केल्यास मंगळवारी , २८ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता कृषी उत्पन्न बाजार समिती आवारात साखळी उपोषण सुरू करण्यात येणार असल्याचा इशाराही देण्यात आला आहे. 'न्याय मिळेपर्यंत आंदोलन सुरूच राहील, अन्यथा पुढील काळात आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल,' असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

यावेळी निवेदन देतांना सुनिल तामखाने, संदीप वहिले, सचिन खोकले, प्रदीप कौलखेडे, राजेंद्र ठाकरे,पवन अग्रवाल, संजय नागवान, सागर गुल्हाने, नितीन गुल्हाने, प्रदीप गावंडे, किर्ती भारूका, योगेश अग्रवाल, शिवा मेहरे, शिवदास तिरकर, अमोल काळे, राहुल डिंकर, श्रीकांत वहिले,अतुल सांगोले, आशिष अग्रवाल, गोपाल अग्रवाल,प्रवीण हजारें, शेखर गावंडे, राठीजी, नंदु खंडारे, अमोल ठोकळ, अतुल लाढा, गिरीश नवघरे, संजय मालवीय, नवीन मंत्री, शुभम काळे, दिलीप वाकोडे, मंगेश काळे, तुळशीदास महल्ले,कैलास साबू, निखिल अग्रवाल,अतुल इंगोले,पवन मडगे, राजु दुबे, चेतन मेटकर , अब्दुल मुजाहिद आदींसह शेकडो व्यापारी ,अडते , हमाल , मदतनीस व शेतकरी उपस्थित होते.

### आरोपी कडून रक्कम वसूल करा

याप्रकरणी चार आरोपींनी जवळपास दोन कोटी रुपयांचे सोयाबीन खरेदी करून अडत्यांना देण्यात येणाऱ्या रकमेचा अपहार केला आहे. याबाबत फिर्याद दाखल करण्यात आली असून आरोपी कडून रकमेची वसुली करून अडते ,व्यापारी, मदतनीस व शेतकऱ्यांना न्याय द्यावा.

**रितेश मडगे,** सचिव ,कृऊबा, समिती मूर्तिजापूर

### चौकशी अंती कारवाई करू

मूर्तिजापूर कृऊबा समितीचे निवेदन प्राप्त झाले आहे. सदर प्रकरण निबंधक यांच्याकडे वर्ग करण्यात आले असून संबंधीतांकडून चौकशी करण्यात आल्यावर कारवाई करण्यात येईल.

**संदीपकुमार अपार**, उपविभागीय अधिकारी, मूर्तिजापूर

### साखळी उपोषण सुरू करू

कृऊबा समितीत अग्रवाल कुटुंबातील चार खरेदीदारांनी १ कोटी ८२ लाखांच्या धान्य मालाची खरेदी करून आमच्याकडून माल घेतला. मात्र मुदतीत रकमेचा भरणा न करता पसार झाले. याबाबत २४ फेब्रुवारी रोजी तक्रार दाखल केली. यातील दोनच आरोपी अटकेत असून उर्वरीत आरोपी मोकाट फिरत आहे. उर्वरीत आरोपींना अटक करून आमच्या रकमेची वसुली करून द्यावी, अन्यथा २८ एप्रिल पासून बाजार समितीच्या प्रांगणात आम्ही सर्व अडते ,व्यापारी, हमाल, मदतनीस व शेतकरी हे साखळी उपोषणाला सुरवात करणार आहो

**सुनील तामखाने,** अध्यक्ष , अडते संघटना ,कृऊबा समिती, मूर्तिजापूर

### पाठपुरावा करून संबंधितांना न्याय देण्याचा प्रयत्न

संबंधीत प्रकरणाचा तपास काटेकोरपणे सुरू आहे. यातील मुख्य आरोपींनी प्रकरण व्हायच्या अगोदरच मुलाचे नावे पावर आफ अटारणी करून दिल्याने कायदेशीर प्रकरण हाताळण्यासाठी वकिलांच्या सल्ल्याने सुरु असून लवकरच याविषयी पाठपुरावा करून संबंधीताना न्याय देण्याचा प्रयत्न सुरू आहे.

**अनिल जुमळे,** उपविभागीय पोलीस अधिकारी, आर्थिक गुन्हे शाखा, अकोला

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK